www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक **युवक आधार** मराठी
तरुणांचा बुलंद आवाज

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 208 वा रविवार दि. 13 एप्रिल २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

दै. युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

## भारत रत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त पाटोदा पोलिस स्टेशन मध्ये शांतता कमिटीची बैठक संपन्न.

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी)**

– महामानव विश्व रत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त शनिवार दिनांक १२ एप्रिल– २०२५ रोजी सकाळी ठिक – ११:३० वाजता पाटोदा शहर व पोस्ट हद्दीतील शांतता कमिटीची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष, पदाधिकारी, सदस्य, तसेच परिसरातील विविध प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. या वेळी जयंती उत्सव शांततेत, सुसंघटित व सौहार्दपूर्ण वातावरणात साजरा व्हावा, या साठी महत्त्वाच्या सूचना व मार्गदर्शन करण्यात आले. बैठकीत खालील मुद्द्यांवर सविस्तर चर्चा झाली मिरवणुकीचा मार्ग, वेळ आणि शिस्तबद्ध आयोजन पोलीस बंदोबस्ताची तयारी व सुरक्षा यंत्रणा ध्वनिप्रदूषण नियमांचे पालन करण्याचे आवाहन तसेच जातीय सलोखा व सामाजिक ऐक्य जपण्यावर भर स्वच्छता, पाणी व्यवस्था व सार्वजनिक ठिकाणांची योग्य देखभाल या विषयावर चर्चा झाली. या बैठकीस पाटोदा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक तसेच सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार व भिम सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.





## पनवेलमध्ये महानगरपालिकेच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त भव्य मिरवणुकीचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

पनवेल महानगरपालिकेच्या माध्यमातून लोकसहभागातून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त सोमवार, १४ एप्रिल २०२५ रोजी भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले आहे. या मिरवणूकीसाठी पनवेल कार्यक्षेत्रातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे.

या मिरवणूकीची सुरुवात सकाळी 7:30 वाजता पनवेल येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून, पूजापाठ करून होणार आहे. त्यानंतर लगेच या ठिकाणाहून भव्य मिरवणूक निघणार असून, तिचा समारोप भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन येथे होणार आहे.

**मिरवणूक पुढील मार्गाने जाणार आहे:**
छत्रपती शिवाजी महाराज चौक – एमटीएनएल कार्यालय– संत जगनाडे महाराज चौक – रोहिदास वाडा – टपाल नाका – कर्नाळा सर्कल – भाजी मार्केट – कर्मवीर भाऊराव पाटील चौक – विरूपाक्ष मंदिर– लाईन आळी – गुणे हॉस्पिटल –भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन (समारोप).



## आदरणीय जिल्हाधिकारी महोदयांसोबतची सक्रिय सकाळ.

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**
**चंद्रशेखर वाघमारे**
**पपु निवळीकर**



नांदेड – शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांबाबत पीकविमा, PM किसान दुरूस्ती, कर्जमाफी पुढील आठवड्यात घेणार विशेष बैठक नांदेड जिल्ह्याचे सन्माननीय जिल्हाधिकारी राहुलजी कर्डिले हे वझरगा येथील मन्याड नदी गाळ उपसा कार्यक्रमाच्या शुभारंभ निमित्त दौऱ्यावर आले, तेव्हा अटकळी येथे मा. प्रमोदजी देशमुख व विनोदजी देशमुख यांनी आदरतिथ्य केले जिल्हाधिकारी महोदय अगदी ठरल्याप्रमाणे सकाळी ठीक 8:30 वाजता फिल्डवर पोहोचले. याप्रसंगी हाळी येथील शेतकरी आंदोलनाचा संदर्भ देऊन लवकरात लवकर बैठक घ्यावी याबाबत चर्चा झाली. पुढील आठवड्यात बैठक नक्की घेऊ असा शब्द दिला आहे आजची सकाळ खूपच ऊर्जावान झाली. जिल्हाधिकारी साहेबांसोबत विविध प्रश्नांबाबत चर्चा व मन्याड नदीच्या पुनर्जीवनाच्या कामाला सुरुवात झाली यावेळी देगलूर–बिलोली मतदारसंघाचे आमदार जितेशभाऊ अंतापूरकर, जलसाक्षरता केंद्राचे संचालक डॉ. सुमंत पांडे सर, उपजिल्हाधिकारी अनुपजी पाटील, बिलोली उपजिल्हाधिकारी क्रांती मॅडम, जिल्हा जलसंधारण अधिकारी कांबळेजी, तहसीलदार भरतजी सुर्यवंशी व सर्व प्रशासकीय विभागातील संबंधित अधिकारी, परिसरातील सरपंच व शेतकरी मंडळी उपस्थित होते.

## पाणीपुरवठा अखंडित का होत नाही? पालिकेचा बोगस कारभार

**दैनिक युवक आधार**
**मुबंई वार्ताहर**



*विरार पूर्व येथील जिवदानी रोड आंबेडकर नगर येथील गोल विहिरी जवळ 24 तास पाणीपुरवठा होत आहे या ठिकाणी पालिकेने कारवाई न करता पाणीपुरवठा अखंडित सुरू आहे वसई विरार मध्ये पाण्याची कमतरता भासत असता या ठिकाणी कितीतरी टन पाणी वाया जात आहे तेथील स्थानिक नागरिकांनी पालिकेला वारंवार ही बाब लक्षात आणून दिली तरी देखील काही फरक पडला नाही ही तक्रार विकास चव्हाण शाखा प्रमुख ,उपशहर अधिकारी युवा सेना गौरव कलांगण यांना ही बाब लक्षात आणून दिले त्यांनी महानगरपालिका तात्काळ कारवाई करण्याचे सांगितले तरी पालिकेने कारवाई केली जाईल असे म्हटले पण अद्याप पूर्ण पणे पाणी पुरवठा बंद झाले नाही आहे जर हा पाणी पुरवठा लवकरात लवकर बंद नाही झाला तर युवा सेना आयुक्तांची भेट घेणार
असे उपशहर अधिकारी गौरव कलांगण यांनी सांगितले आहे

# माणगाव तालुक्यातील उतखोल वाडी येथे हनुमान जयंती उत्साहात साजरी.....

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :-संदेश बांदल**
**माणगाव प्रतिनिधी**

**माणगाव** :-सालाबाद प्रमाणे या वर्षी ही माणगाव तालुक्यातील उत्तेखोल वाडी येथे हनुमान जयंती जलोश्यात साजरी करण्यात आली यावेळी उतेखोल वाडीतील महिला वर्ग वृद्ध व नवतरुण यांनी सकाळ पासून अभिषेक पूजा तसेच भजन व खालू बाज्याच्या ठेक्यावर नाचत गाजत हनुमान मंदिर ते संपूर्ण गावात मिरवणूक काढण्यात आली. हनुमान जयंती उत्सव दरवर्षी मोठ्या जल्लोषात सर्वत्र साजरा केला जातो. श्री हनुमान हे अफाट शक्तीचे प्रतीक मानले जाते त्याची श्रीरामावर असीम भक्ती होती देशात अनेक ठिकाणी तसेच जगाच्या विविध कोपऱ्यात हिंदू हा दिवस मोठया श्रध्येने श्री हनुमानाची आराधना केली जाते काही भक्त या दिवशी उपवास तसेच मंदिराला भेट देतात यंदा हनुमान जयंती 12 एप्रिल रोजी शनिवारी असल्यामुळे हनुमान जयंती शुभ मानलं जात. हिंदू पंचाननुसार हनुमानाचा जन्म चैत्र महिन्याच्या पौर्णिमेला दिवशी सूर्योदयच्या वेळी झाला होता म्हणून अनेक मंदिरामध्ये पहाटेपासून सूर्योदयपर्यंत आध्यत्मिक प्रवचन आणि प्रार्थना केली जाते. या कार्यक्रमला माणगांव नगरपंचायत माझी नगराध्यक्ष आनंद शेठ यादव, संदीप खरंगटे, नगरसेविका रश्मी सागर मुंडे, तसेच ग्रामस्थ व मुंबईकर मंडळ या कार्यक्रमाला उपस्थित होते..



## डॉ.आंबेडकर जयंतीत तमाम भीम अनुयायी व आंबेडकर प्रेमींनी सहभागी व्हावे: प्रकाशशेठ गायकवाड

**दैनिक युवक आधार**
**रसायनी:(आनंद पवार)**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार परमपूज्य विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा १३४ वा जयंती महोत्सव सोमवार दि.१४एप्रिल रोजी जगभरात मोठ्या उत्साही व आनंदमय वातावरणात साजरा केला जाणार असून रसायनी–मोहोपाडा परिसरातही डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले आहे तरी मिरवणुकीत हजोरोंच्या संख्येने भीम अनुयायी व आंबेडकर प्रेमी जनतेने मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन सम्यंक सामाजिक संस्थेचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते प्रकाशशेठ गायकवाड यांनी केले आहे.

घटनेचे शिल्पकार विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती दरवर्षी जगभरात मोठ्या जल्लोषात व धुमधडाक्यात साजरी केली जाते. रसायनी–मोहोपाडा परिसरातही सार्वजनिक जयंती उत्सवाचे शानदार आयोजन करण्यात आले आहे. रिस येथील आयसीआयसीआय बँक जवळ सकाळी ९:३०वा ध्वजारोहण बुद्ध पूजापाठ व सूत्रपठणचा कार्यक्रम होणार असून सायंकाळी ४वा.रिस येथील आयसीआयसीआय बँक ते एच.ओ.सी. कॉलनीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन पर्यंत भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले आहे. तरी या भव्य दिव्य मिरवणुकीमध्ये परिसरातील सर्व भिम अनुयायींनी व आंबेडकर प्रेमी जनतेने मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन प्रकाशशेठ गायकवाड, यांनी केले आहे.

# गोंदियातील दवनीवाडा या ठिकाणी मानव धर्माचे संस्थापक महान त्यागी बाबा जुमदेवजी यांच्या 104 वी जयंती

**दैनिक युवक आधार**
**सचिन बन्सोड गोंदिया**

आदेशानुसार सामुहिक एकतेचे हवन कार्य बाबांचे सेवक सुरेश जी कोरे यांच्या निवासस्थानी घडविण्यात आले व नंतर संपूर्ण गावातून भगवान बाबा हनुमान जी , महान त्यागी बाबा जुमदेवजी व आई वाराणशी यांच्या प्रतिमेची शोभायात्रा काढण्यात आली .व त्यानंतर स्पेशल चर्चा बैठकीला सुरुवात करण्यात आली. तत्पूर्वी बाबा हनुमान जी, महान त्यागी बाबा जुमदेवजी, व आई वाराणशी यांच्या प्रतिमेची पूजन करून माल्यार्पन करून दिपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर चर्चा बैठकीला सुरुवात करण्यात आली चर्चा बैठकीचे अध्यक्ष श्री. बालकदासजी ठवकर मार्गदर्शक खापा,
उद्घाटक श्री. वसंत जी लिल्हारे परमात्मा एक सेवक मोहाडी,
प्रास्ताविक प. एक सेवक दिनेश जी वाडीभस्मे रा. तुडका
संचालक प.एक सेविका सौ. प्रतिमा हितेंद्र लिल्हारे दवनीवाडा
मार्गदर्शन --श्री सुभाष जी ठवकर मार्गदर्शक मांढळ
श्री प्रल्हाद जी भोंगळे मार्गदर्शक पारडीबांध
श्री नरेंद्र जी गुरबेले मार्गदर्शक मोगर्रा
श्री एकनाथ जी सपाटे मार्गदर्शक चुरडी
श्री.प्रदिपजी चौधरी मार्गदर्शक वडेगाव
श्री अशोक जी पटले प.एक. से.कोहका
श्री.राजेश जी देवधारी मार्गदर्शक काटी
श्री. लक्ष्मणजी कार्देकर जेष्ठ मार्गदर्शक तिरोडा
प्रमुख अतिथी --
श्री.जगदिशप्रसादजी श्रीवास्तव जेष्ठ मार्गदर्शक झालुटोला
श्री.छत्रपालजी नागपूरे मार्गदर्शक कोहका
श्री. दिनेश जी माहुरे मार्गदर्शक अत्री
श्री सुनीलजी गौंधर्य प.एक सेवक देवरी
श्री. रंजितजी बिसेन प.एक सेवक तिरोडा
श्री. लक्ष्मीचंदजी पांचे प.एक सेवक बडेगाव
श्री.जिवनजी खैरवार प.ए से. बुध्दुटोला
श्री. बाबुलाल मरस्कोल्हे प.ए.से. कटंगटोला श्री. सुरेशजी भोंडेकर प..ए.से.बघोली
श्री. सुखचरण बारेवार प.ए.से. बनाथर
सौ. लिलावतीताई रहांगडाले प. ए. सेविका धापेवाडा
इंद्रवज्राबाई पारधी प.ए.सेविका गोमाटोला
सुनंदा बाई पारधी पण.ए. सेविका गोमाटोला ई. पाहुणे उपस्थित होते.
चर्चा बैठकीचे आभार प्रदर्शन भुमेंन्द्र बरेले प.ए. से. यांनी केले.
यासोबतच याठिकाणी आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले याकरिता त्रिशा मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल गोंदिया चे नामांकित डॉक्टरांनी आपले योगदान दिले व दवनीवाडा परिसरातील जास्तीत जास्त नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला . यासोबतच नागरिकांना आयुष्यमान कार्ड बाबत माहिती देण्यात आली व त्याचे फायदे समजावून सांगण्यात आले.



# आकाश फाउंडेशनं तर्फे रायगड जिल्हा परिषदेच्या पाले शाळेत प्रोजेक्टर भेट.

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी रणिता ठाकूर**

रायगड जिल्हा परिषदेच्या पाले शाळेत प्रोजेक्टर भेट देण्यात आला आहे. या प्रोजेक्टरच्या माध्यमातून होणार विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमात मदत होणारं आहे. नवा प्रोजेक्टर पाहून विद्यार्थ्यांचा आंनद अवर्णनीय होता.सारडे विकास मंच आणि आकाश फाउंडेशन मुंबईच्या सेक्रेटरी संजीवनी शृंगारे व करिश्मा यांच्या माध्यमातून गेली अनेक वर्ष गरजूंना कपडे, शैक्षणिक साहित्य,लहान मुलांना खेळणी, संसार उपयोगी भांडी सारडे विकास मंच कडे देण्यात येतात, व या वस्तू गरजूंना देण्याचं काम सारडे विकास मंचच्या माध्यमातून केलं जातं. Panasonic PT-LX 300 प्रोजेक्टर ज्याची बाजारातील किंमत 43000 ते 45000, असून या प्रोजेक्टरच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अभ्यास करणे सुलभ होते, हा प्रोजेक्टर सारडे विकास मंचकडे आकाश फाउंडेशन मुंबई यांच्या माध्यमातून देण्यात आला. कोणत्याही गरजूंना किंवा अभ्यासक्रमात उपयोगी पडेल अशा प्रोजेक्टर चे स्टेटस व्हाट्सअप च्या माध्यमातून सारडे विकास मंचचे अध्यक्ष नागेंद्र म्हात्रे यांनी ठेवले, व राजिप शाळा पालेचे व्यवस्थापन समिती अध्यक्ष मेनन म्हात्रे यांना या संदर्भात माहिती मिळताच त्यांनी पाले शाळेला हा प्रोजेक्टर मिळवा अशी विनंती केली. नागेंद्र म्हात्रे यांना केली, त्यानुसार शुक्रवार दिनांक 11 एप्रिलला हा प्रोजेक्टर सारडे विकास मंचचे अध्यक्ष नागेंद्र म्हात्रे तसेच सदाबहार दोस्ती ग्रुप प्रतिष्ठान उरणचे हरिश्चंद्र म्हात्रे, पाले शाळेच्या मुख्याध्यापिका पुष्पलता म्हात्रे, चैताली म्हात्रे,मेनन म्हात्रे, नितिन म्हात्रे, शर्मिला म्हात्रे या मान्यवराच्या हस्ते प्रोजेक्टरचं उद्घाटन करण्यात आले या प्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका पुष्पलता म्हात्रे चैताली म्हात्रे यांनी सारडे विकास मंच तसेच आकाश फाउंडेशन मुंबईच्या सेक्रेटरी संजीवनी शृंगारे यांचे आभार व्यक्त करत आधुनिक युगात प्रोजेक्टर चा वापर मुलाच्या शिक्षणासाठी आणि प्रगती साठी नक्की करू असे मत व्यक्त केले.



## दीपस्तंभ या प्रबोधनात्मक ऑर्केस्ट्राचा आस्वाद घ्यावा- सिद्धार्थ नवयुवक मंडळ गोभणी यांचे आवाहन

**दैनिक युवक आधार**
**रिसोड तालुका प्रतिनिधी.**
**रणजीत सिंह ठाकुर**

रिसोड तालुक्यातील गोभणी येथील विश्वरत्न बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त सिद्धार्थ नवयुवक मंडळ गोभणी यांनी आयोजित केलेल्या महाराष्ट्रात गाजलेल्या बहारदार अशा आयुष्यामती रेखा दशरथ खडसे प्रस्तुत दीपस्तंभ या प्रबोधनात्मक बुद्ध -भीम गीतांचा बहारदार कार्यक्रम दिनांक १३ एप्रिल २०२५ रविवारला सायंकाळी ६ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह (सभा मंडप) गोभणी येथे संपन्न होणार असून यातील प्रा. दशरथ खडसे (गायक),रेखा दशरथ खडसे (गायिका), प्रणाली दशरथ खडसे (गायिका), कपिल संजय खडसे (गायक), भगवान खडसे (ढोलक तथा ढोलकी), भास्कर गायकवाड (कीबोर्ड), संघपाल खडसे (तबला), प्रणव खडसे (अक्टोपॅड), भूषण खडसे (लाईट तथा साऊंड), ज्ञानेश्वर गोरे, शंकर गोरे, बालाजी व रामेश्वर कव्हर ( तंत्र सहाय्यक) या सर्व कलाकारांच्या कलेचा व या प्रबोधनात्मक कार्यक्रमाचा पंचक्रोशीतील मंडळींनी लाभ घ्यावा असे सिद्धार्थ नवयुवक मंडळ गोभणी यांनी आवाहन केले आहे..



द•ख•ल

## अलिबागजवळ समुद्रात थरार: प्रवासी बोटीला छिद्र, 130 जणांचे प्राण वेळेवर वाचले

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

आठवड्याच्या सुट्टीत पर्यटकांनी गजबजलेल्या अलिबागजवळील समुद्रात शनिवारी सायंकाळी एक धक्कादायक घटना घडली. मांडवा जेट्टीच्या समुद्रात एका प्रवासी बोटीला अचानक छिद्र पडलं आणि बोटीत पाणी शिरू लागलं. या वेळी बोटीवर तब्बल 130 प्रवासी होते. मात्र, वेळेवर मिळालेली माहिती आणि यंत्रणांनी दाखवलेली तत्परता यामुळे मोठा अनर्थ टळला.सायंकाळी साडेपाचच्या सुमारास ही घटना घडली. बोटीमध्ये पाणी शिरू लागल्याचं लक्षात येताच प्रवाशांमध्ये एकच गोंधळ उडाला. भयभीत प्रवाशांमध्ये तातडीची हलचल सुरू झाली. याच वेळी स्थानिक सागरी यंत्रणांनी तत्काळ हस्तक्षेप करत सर्व प्रवाशांना सुरक्षितपणे किनाऱ्यावर हलवलं.रायगड जिल्ह्यातील मांडवा सागरी पोलिसांनी घटनेच्या वृत्तास दुजोरा दिला असून, सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही.मुंबई आणि अलिबाग यामधील सागरी मार्ग हा पर्यटकांसाठी अत्यंत लोकप्रिय ठरतो. विशेषतः वाहतूक कोंडीपासून दूर राहत सागरी मार्गाने जलद प्रवास करण्यासाठी पर्यटक मोठ्या प्रमाणावर बोटींचा पर्याय निवडतात.मात्र, प्रवाशांची संख्या वाढत असताना बोटींमध्ये वापरल्या जाणाऱ्या सुरक्षाव्यवस्था आणि देखरेखीच्या बाबतीत काहीवेळा हलगर्जीपणा होताना दिसतो. ही घटना त्याचं जिवंत उदाहरण ठरली आहे.ही दुर्घटना टळली खरी, पण भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी सागरी वाहतूक सेवा पुरवणाऱ्या यंत्रणांनी अधिक सतर्कता बाळगणं, तसेच प्रवाशांनीही स्वतःच्या सुरक्षेच्या बाबतीत जागरूक असणं गरजेचं आहे.




## पाण्याच्या पातळीत कमालीची घट, अनेक विहीरी पडल्या कोरड्या

**दैनिक युवक आधार**
**रिसोड प्रतिनिधी.**
**रणजीत सिंह ठाकुर**

आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी शेतकरी पावसाळा हिवाळा व उन्हाळ्यात या तिन्हीही मौसमात ऋतू प्रमाणे शेतात पिके घेतात, मात्र सिंचनासाठी पाण्याच्या कमतरतेमुळे यावर्षी उभ्या पिकात जनावरे चारण्याची पाळी शेतकऱ्यावर ओढवली आहे. रिसोड तालुक्यातील शेतकरी हे लघुसिंचन प्रकल्प व विहिरीच्या माध्यमातून शेती ओलीत करतात. दरवर्षी प्रमाणे शेतकऱ्यांनी ऊन्हाळी पीकाची मोठ्या प्रमाणात लागवड केलेली आहे. त्यामध्ये तीळ, भुईमुग ज्वारी, बाजरी, कांदा, मका, फळवर्गीय भाजी व भाजीपाल्याची मोठ्या प्रमाणात लागवड केली आहे . त्यासाठी स्प्रिंकलरद्वारे पाण्याचे नियोजन केले आहे, परंतु एप्रील महीन्यामध्ये विहिरीतील पाण्यामध्ये दररोज कमालीची घट होत असल्यामुळे शेतकऱ्यांनी उपाययोजनेसाठी काही शेतकऱ्यानी विहरीचा गाळ काढून खोलीकरण करण्याचा प्रयत्न केला आहे, तर काही शेतकऱ्यांनी शेतात कुपनलीकाचा प्रयोग केला मात्र आडयात पाणी नसेल तर पोहऱ्यात कसे येणार त्यामुळे नाईलास्तव काही शेतकऱ्यावर आपल्या उभ्या पिकात जनावरे चारण्याची पाळी आलेली आहे. त्यामुळे पीकाच्या लागवडीसाठी केलेला खर्च वाया गेल्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात आर्थिक फटका बसला आहे. पाण्याच्या कमालीच्या घटीमुळे उभ्या पिकात जनावरे सोडण्याची पाळी शेतकऱ्यावर आली असून त्यांना मोठा आर्थिक फटका बसला आहे. शासनाने सुरू केलेल्या जलतारा योजनेकडे शेतकऱ्यांचा पाहिजे तसा प्रतिसाद नसून शेतकऱ्याने स्वतःहून जलताराचा प्रयोग आपल्या शेतात करावा जलताराचे शोषखड्डे घेतल्यामुळे पाण्याच्या प्रमाणात चांगल्या प्रमाणात विहीर बोरवेल व जमिनीत पाण्याची पातळी साठवून राहते तरी सुद्धा शेतकरी शासनाच्या या योजनेकडे दुर्लक्ष करीत आहेत ,प्रत्येक शेतकऱ्याने प्रत्येक शेतात जलतारा घ्यावा असे आवाहन आवाहन ही यावेळी रिसोड पंचायत समितीचे सदस्य गजाननराव वाघ यांच्याकडून यावेळी करण्यात आले आहे

# साधु-संत हे मानवाच्या कल्याणासाठी काम करतात; हभप गणेश महाराज स्वामी

**दैनिक युवक आधार**
**प्रशांत तांबोळकर लातुर**
**शिरूरआनंतपाळ**

: साधू-संताच्या कृपेशिवाय दैन्यदीन जीवनात आनंद नाही. म्हणून आपण सर्वानी सत्संगाला उपस्थित राहून परमेश्वराचे चिंतन करावे. मानवी जीवनात साधु-संत्ताच्या सानिध्यातच खरा आनंद मिळतो असे हभप गणेश महाराज स्वामी यांनी व्यक्त केले. येरोळ ता.शिरूरआनंतपाळ येथील विठ्ठल रूक्मीणी मंदिरात आयोजीत केलेल्या अखंड हरिनाम सप्ताह व कलशारोहन कार्यक्रमात काल्याच्या किर्तन व महाप्रसाने कार्यक्रमाची सांगता झाली त्यावेळी ते बोलत होते. जगतगुरू संतश्रेष्ट तुकाराम महाराज यांच्या उपजोनिया पुढती येऊ। कालाखाऊ दहीभात ।। वैकुंठे ते ऐसे नाही। कवळ काही काल्याचे ।। एकमेका देऊ मुखी । वैकुंटी ते ऐसे नाही । कवळ काही काल्याचे।। या अभंगावर चिंतन केले. पुढे निरुपन करताना गणेश महाराज म्हणाले की दहीभाताचा काला खाण्यासाठी आम्ही पुन्हा जन्म घेऊ. हा काला वैकुंटातही मिळत नाही. त्यामुळे हा काला फक्त जो भक्त सत्संगाला येतो त्यालाच मिळत असल्याचे सांगितले. या क्षणभंगुर जिवनात कोणतेही टेन्सेंन घेऊ नका. आणि टेन्सेंनमुळे आत्महत्या करु नका. तुम्ही आत्महत्या केल्यामुळे तुमच कुंठुंब उध्दवस्त होत असल्याचे सांगुन राग आला की एखाद्या मंदिरात जाऊन देवाचे नामस्मरण करा. तो परमेश्वर तुमचे संकट दुर केल्याशिवाय रहाणार नाही असे सांगितले. या अखंड हरीनाम सप्ताहात दररोज सायंकाळी नामवंत किर्तनकाराची किर्तने झाली. तर विठ्ठल रुक्मिणी मंदिराचा कलशारोहन कार्यक्रम विधीपुर्वक करण्यात आला.महिलांना गावातुन विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल नामाच्या जयघोषात डोक्यावर तुळशीवृंदावन घेऊन गावप्रदक्षिणा घालण्यात आली. तर या श्री. विश्वशक्ती आयुर्वेद चिकित्सालय लातुर यांच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी शिबीर घेण्यात आले. यावेळी विठ्ठल रुक्मीणी मंदिर समितीच्या वतीने गायक मंदृगवादक विनेकरी व मंदिराला मदत करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.



महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## निर्भय महाराष्ट्र पार्टीचे चिखली तालुकाध्यक्ष राजेंद्र लहाने यांनी गटसाधन केंद्रातील कर्मचाऱ्यांना धरले धारेवर.

**दैनिक युवक आधार**
**वाशिम जिल्हा/ प्रतिनिधी**
**करण धोंगडे**

निर्भय महाराष्ट्र पार्टीचे संस्थापक अध्यक्ष जितेंद्र भावे यांच्या नेतृत्वाखाली काम करत असताना चिखली तालुका अध्यक्ष राजेंद्र लहाने यांनी
चिखली पंचायत समिती कार्यलयाला भेट दिली असताना अधिकारी व कर्मचारी यांचे मुलभूत अधिकार काय हे समजून घेण्यासाठी कार्यालयामध्ये निर्भय महाराष्ट्र पार्टीचे तालुकाध्यक्ष राजेंद्र लहाने तसेच सहकारी मित्र शिंगणे हे उपस्थित होते,आम्ही या कार्यालयामध्ये गेलो असतानां त्या ठिकाणी कोणत्याच कर्मचाऱ्यांच्या गळ्यात ओळखपत्र




दिसून आले नाही, आम्ही त्यांना ओळखपत्र घालण्यास अनिवार्य आहे असे त्यांना सांगितले व तसेच गटविकास अधिकारी यांच्याकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे,आपल्या कार्यालयामध्ये माहिती अधिकार फलक लावणे व हालचाल लेटर जनतेला पाहाव्यास उपलब्ध करून दिले पाहिजे अशा सूचना ज्यावेळी राजेंद्र लहाने यांनी दिल्या आहेत,या देशाची जनता मालक आहे,अधिकारी व कर्मचाऱ्यांना याचा विसर पडत चालला आहे,आम्ही निर्भय महाराष्ट्र पार्टी च्या वतीने ओळखपत्र घालण्यास भाग पाडले,तसेच त्यांना संविधानाची प्रस्ताविका देऊन निर्भय महाराष्ट्र पार्टीचे कार्य हे समजावून सांगितले, निर्भय महाराष्ट्र पार्टीच्या वतीने संपूर्ण कार्यालयामध्ये शिस्त लावण्याची मोहीम चालू केले आहे, हेच काम निर्भय महाराष्ट्र पार्टीच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्र सुरू आहे असे यावेळी राजेंद्र लहाने म्हणाले.



**दैनिक युवक आधार - येरोळ ता.शिरूरआनंतपाळ येथे हनुमान जन्मोत्सवा निमित्त महाप्रसाद वाटप करण्यात आले,**

# आ. भावनाताई गवळी पाटील यांच्या नेतृत्वात राळेगावच्या उपनगराध्यक्ष व नगरसेवकांचा शिवसेनेत प्रवेश

### यवतमाळ जिल्ह्यात काँग्रेसला खिंडार खा.डॉ. श्रीकांत शिंदे यांची उपस्थिती राळेगाव मतदार संघात खळबळ

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:**
**-जितेंद्र खोडे राळेगाव:**

-तालुक्यातील राजकारणात दबदबा असलेले तसेच नगर पंचायतचे उपनगराध्यक्ष कॉग्रेसचे जानराव गीरी तसेच इतर चार नगर सेवकांनी शिवसेनेत प्रवेश केला आहे. मुंबई येथे शिवसेनेच्या युवासेनेचे नेते खासदार डॉ.श्रीकांत शिंदे तसेच विधान परिषदेच्या आमदार भावनाताई गवळी यांच्या उपस्थितीत त्यांनी शिवबंधन बांधले. या घटनेने राळेगाव मतदार संघातील राजकारणात चांगलीच खळबळ उडाली आहे. काँग्रेस कार्यकर्ते जानराव गीरी हे गेल्या अनेक वर्षापासून राळेगाव परिसरात राजकीय क्षेत्रात सक्रीय

**शिवसेना आणखी प्रबळ करणार**
शिवसेनेच्या सामाजिक कार्यामुळे तसेच वाढत्या प्रभावामुळे अनेक जन शिवसेनेत प्रवेश घेत आहे. आम्ही त्यांचे स्वागत करीत आहो. यवतमाळ जिल्हयात शिवसेनेचे पक्षप्रमुख एकनाथजी शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन शिवसेना आणखी प्रबळ करण्याचे आमचे ध्येय आहे. त्याअनुषंगाने जिल्ह्याच्या प्रत्येक भागात शिवसेनेच्या शाखा काढण्यासाठी तसेच शिवसेना मजबूत करण्यासाठी आमचा प्रयत्न सुरु आहे.
**- भावनाताई गवळी आमदार, विधान परिषद**

आहे. सध्या ते राळेगाव नगर पंचायतीचे उपनगराध्यक्ष आहे. त्यांनी शिवसेनेत प्रवेश केल्याने काँग्रेसला मोठं खिंडार पडलं आहे. आमदार भावनाताई गवळी यांच्या नेतृत्वाखाली खासदार श्रीकांत शिंदे यांच्या उपस्थितीमध्ये काँग्रेसचे जानराव गीरी, नगर सेवक भानुदास राऊत, प्रतिक बोबडे, गणेश कुडमेथे, अनिल डंभारे यांनी शिवसेनेच्या शिंदे गटामध्ये प्रवेश केला. याप्रसंगी शिवसेनेचे यवतमाळ जिल्हाप्रमुख उमाकांत पापीनवार, यवतमाळ शहर प्रमुख पिंटु बांगर उपस्थित होते. राजकारणात कोणी कोणाचा मित्र नसतो व कोणी कोणाचा शत्रू नसतो, ही म्हनं सर्वत्र प्रसिद्ध आहे. हे आ. भावनाताई गवळी पाटील यांनी लोकसभेच्या अनेक निवडणुकांमधून



दाखवून दिले आहे. काही अपवाद वगळता यवतमाळ व वाशिम जिल्ह्यातील राजकारण्यांचा गवळी यांच्या नेतृत्वावर विश्वास असल्याचे गेला २५ वर्षापासून दिसून येत आहे. आता देखील दोन-तीन महिन्यापासून यवतमाळ व वाशिम जिल्ह्यातील काँग्रेस, उबाठा व राष्ट्रवादीचे नेते व कार्यकर्ते आमदार भावनाताई गवळी यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून शिवसेनेत प्रवेश करत असल्याचे दिसून येते.










श्री छत्रपती शिवाजी विद्यालय वावंजे -पनवेल बॅच SSC - २००३ आयोजित माजी विद्यार्थी आणि गुरुजन स्नेह संमेलन आम्ही सर्व माजी विद्यार्थी २२ वर्षानंतर एकत्र माजी विध्यार्थ्यांचा गेट टुगेदर आणि गुरुपूजन सोहळा संपन्न केला या कार्यक्रम अंतर्गत आम्ही सर्व २००३ च्या माजी विध्यार्थ्यांनी शाळेसाठी उपयोगी असणारी साउंड सिस्टम स्पीकर आणि मिक्सर मशीन देण्यात आली.
**( छायाचित्र दैनिक युवक आधार )**

# जय भवानीच्या, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे कार्य कौतुकास्पद ! :- पोलीस निरीक्षक सोमनाथ जाधव

### स्पर्धा परीक्षेतील गुणवंतांचा मान्यवरांच्या शुभहस्ते सत्कार...

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी):**

- पाटोदा येथील जय भवानी महाविद्यालयाच्या "स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे कार्य कौतुकास्पद आहे ! असे प्रतिपादन पाटोदा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सोमीनाथ जाधव यांनी केले. ते जय भवानी महाविद्यालयात क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंती निमित्त स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र आयोजित स्पर्धा परीक्षेत विविध पदांसाठी घेतलेल्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या माजी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभात प्रमुख पाहुणे म्हणुन बोलत होते. पुढे बोलताना म्हणाले की पाटोदा सारख्या ग्रामीण भागातील गोरगरिबांच्या मुलांसाठी या महाविद्यालयात मोफत स्पर्धा परीक्षा केंद्र सुरू करून अनेक विद्यार्थी स्पर्धा परीक्षेतून प्रशासकीय अधिकारी म्हणुन त्यांची निवड झाली आहे. त्या सर्व गुणवंताचे अभिनंदन!करून त्यांना भविष्यातील प्रशासकीय कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. व उपस्थित विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. या सत्कार समारंभाचे मार्गदर्शक म्हणुन प्राचार्य डॉ.विश्वास कदम हे होते, तर या समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य प्रा.सोमनाथ घाडगे हे होते. व्यासपीठावर उच्च न्यायालयाचे विधीज्ञ अड.श्री.तात्यासाहेब घुमरे, दै.झुंजार नेताचे जेष्ठ पत्रकार श्री.विजय जाधव, दै.सकाळचे




श्री.विजय जोशी, कनिष्ठ विभागाचे प्रमुख प्रा.सतिश जरांगे, पालक श्री.कैलास आवारे, श्री.सखाराम जायभाये, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे समन्वयक प्रा.डॉ.संदीपान टिकवणे व सत्कार मूर्ती श्री.प्रमोद कर्डुले, रोहीत जायभाये, कु.अंजली जायभाये व राष्ट्रीय क्रिडा स्पर्धेत स्वर्ण पदक मिळविणारी कु.अमृता आवारे यांची उपस्थिती होती. प्रारंभी मान्यवरांच्या शुभहस्ते क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. व त्यांना सामुहिक अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक या विभागाचे समन्वयक प्रा.डॉ.संदीप किवणे यांनी केले. सत्कार मूर्ती श्री.प्रमोद कर्डुले, रोहित जायभाये, कु.अंजली जायभाये, कु.अमृता आवारे यांचा मान्यवरांच्या शुभहस्ते शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना श्री.प्रमोद कर्डुले, रोहित जायभाये, कु.अंजली जायभाये व कु.अमृता आवारे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की या महाविद्यालयात शिक्षण घेताना स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रामुळेच आम्हाला अभ्यासाची प्रेरणा मिळाली व त्यामुळेच आम्हाला परीक्षेत यश मिळाले तसेच विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी मनोगत व्यक्त केले. पालक श्री.सखाराम जायभाये, जेष्ठ पत्रकार श्री.विजय जाधव, श्री.विजय जोशी, अड.श्री. तात्यासाहेब घुमरे यांनी प्रेरणादायी मार्गदर्शन केले. प्रमुख मार्गदर्शक प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांनी सांगितले की पाटोदा सारख्या ग्रामीण भागातील मुलांमध्ये बौद्धिक शक्ती आहे. परंतु त्यांना योग्य मार्गदर्शन मिळत नाही म्हणूनच महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र सुरु केले होते. व त्या मुळे ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी यश मिळवत आहेत. हे पाहून समाधान वाटते या पुढे ही ग्रामीण भागातील होतकरू विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम राबविण्यात येतील अशी ग्वाही दिली. व सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या. शेवटी अध्यक्षीय समारोप करताना प्रभारी प्राचार्य प्रा.सोमनाथ घाडगे यांनी सांगितले की आमच्या विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी व आमचे विद्यार्थी यशस्वी झाल्यानंतर त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप टाकण्यासाठीच अशा सत्कार समारंभाचे आयोजन केले जाते. या पुढे राज्य लोकसेवा आयोग बरोबरच केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत संदर्भात या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रा च्या माध्यमातून मार्गदर्शन करण्यात येईल असा शेवटी आशावाद व्यक्त केला. या कार्यक्रमाचे बहारदार सुत्रसंचलन प्रा.डॉ.अशोक देवगुडे यांनी केले. तर आभार अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा.विनोद किर्दक यांनी मानले. या सत्कार समारंभास सर्व प्राध्यापक वृंद, पालक व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. सत्कार समारंभ यशस्वी करण्यासाठी नाटकार प्रा.बापू घोक्षे, प्रा.डॉ.बंडू लोखंडे, प्रा.डॉ. प्रवीण शिलेदार, ग्रंथपाल श्रीमती प्रा. ज्योती रकटे (कटारे), प्रा.केशव सुर्वे, प्रा. बाळासाहेब जोशी, प्रा.शिवाजी मोरे, श्री. शहाजी लवुळ, श्री.नामदेव पोटफाडे, श्री. कुणाल काळे, श्री.दत्ता चादर व श्रीमती साळुबाई नाईकनवरे यांनी अथक परिश्रम घेतले.

## माणूस हळूहळू स्वत :पासून, कुटुंबापासून, आणि आयुष्याच्या खऱ्या आनंदापासून दूर जातो




**दैनिक युवक आधार**
**नेरुळ प्रतिनिधी**

व्यसन मुक्तीचा ध्यास घेतलेलेहआदरणीय व्यक्तिमत्त्व मा श्री दिलीप किसनराव आमले व्यसन म्हणजे काही क्षणांचं सुख, पण संपूर्ण आयुष्याचं दुःख.एकदा का व्यसनाच्या विळख्यात पडलं, की माणूस हळूहळू स्वतःपासून, कुटुंबापासून, आणि आयुष्याच्या खऱ्या आनंदापासून दूर जातो.घर म्हणजे प्रेम, आपुलकी, आधार आणि समाधान यांचं केंद्र. पण जेव्हा व्यसन दारात येतं, तेव्हा हे सगळं हरवतं.पती-पत्नीचं नातं ताणतणावात अडकतं, मुलांच्या डोळ्यात वडिलांचा आदर नाहीसा होतो, आणि घराच्या चार भिंतींमध्ये अस्वस्थतेचं वातावरण निर्माण होते.समाजामध्ये असे काही माणसं असतात जे इतरांसाठी प्रकाशाचा दीप बनतात. अशीच एक व्यक्ती म्हणजे व्यसनमुक्त जिवन काळाची गरज सादरकर्ते मा श्री.दिलीप आमले साहेब. ही व्यक्ती व्यसनाच्या जंजाळात फसलेल्याना अंधारातून बाहेर काढण्याचं दिव्य काम करत आहे. व्यसनात अडकलेल्या व्यक्तींची मानसिकता समजून घेणं, त्यांचं पुनर्वसन करणं, त्यांना नवा आशावाद देणं हे त्यांच्या कार्याचं मर्म आहे.गेल्या 2 दशके अशा व्यक्तींमुळे समाजामध्ये सकारात्मक बदल घडत आहे त्यांच्या कामामुळे अनेक घरांमध्ये पुन्हा हसू फुलतं, नाती जपली जातात आणि जीवन नव्याने सुरू होतं.अशा व्यसनमुक्तीसाठी समर्पित आदरणीय व्यक्तिमत्त्वाच्या कर्तृत्वाला सलाम कारण ते केवळ कार्यकर्ते नाहीत, ते समाजाचे खरे नायक आहेत.मा.श्री.दिलीप किसनराव आमले साहेब.आपणास वाढदिवसानिमित्त आरोग्यादायी आयुष्यासह दिर्घ आयुष्य मनःपूर्वक शुभेच्छा.

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR (**RNI NO :- MAHMAR/2023/89514**) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले सार्वजनिक जयंतीनिमित्त भव्य मिरवणूक; हजारो नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग

**आसाराम विरकर, उपसंपादक**
**दैनिक युवक आधार**
**मराठवाडा आवृत्ती**

छत्रपती संभाजीनगर (११ एप्रिल): क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या २०२५ सालच्या सार्वजनिक जयंतीनिमित्त क्रांती चौक ते महात्मा फुले स्मारक, औरंगाबाद येथे भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले. क्रांतीसुर्य महात्मा फुले सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने आयोजित या मिरवणुकीत राज्यभरातून हजारो नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या मिरवणुकीचे मुख्य मार्गदर्शक व प्रमुख पाहुणे महाराष्ट्र राज्याचे कॅबिनेट मंत्री माननीय नामदार अतुल सावे होते. त्यांच्या उपस्थितीत क्रांती चौक येथून मिरवणुकीचा शुभारंभ करण्यात आला आणि महात्मा फुले स्मारकावर अभिवादन समारंभ पार पडला. या भव्य मिरवणुकीत ६०० हून अधिक कलाकार



सहभागी होते. आदिवासी नृत्य, बंजारा नृत्य, वारकरी पथक तसेच महात्मा फुले यांच्या जीवनकार्यावरील जीवन देखावे यामध्ये विशेष आकर्षण ठरले. विविध कला-संस्कृतीचा संगम या मिरवणुकीत दिसून आला. कार्यक्रमास खासदार कल्याण काळे, आमदार संजय केनेकर, केंद्रीय माजी राज्यमंत्री भागवत कराड, पालकमंत्री संजय शिरसाठ, शिवसेना नेते चंद्रकांत खैरे, जिल्हा प्रमुख राजेंद्र जंजाळ, शांताराम बापू गाडेकर, दिलीप थोरात, अभिजीत व अभिषेक देशमुख डॉक्टर धनवाई यांच्यासह अनेक मान्यवर व पदाधिकारी उपस्थित होते.

या प्रसंगी मंत्री अतुल सावे यांनी आपल्या भाषणात म्हणाले : "महात्मा फुले हे भारतातील सामाजिक क्रांतीचे आद्यपुरुष होते. त्यांनी स्त्री-शिक्षण, शेतकरी, मागासवर्गीय, वंचित घटकांच्या उत्थानासाठी आयुष्य समर्पित केलं. आज आपण त्यांच्या विचारांना आचरणात आणण्याची गरज आहे. महात्मा फुले यांचे कार्य प्रेरणादायी असून त्यांचे विचार हे आजच्या तरुण पिढीने अंगीकारले पाहिजेत. छत्रपती संभाजीनगरमध्ये त्यांच्या स्मृती जपण्यासाठी असे उपक्रम होत आहेत ही अत्यंत आनंदाची बाब आहे. मी सर्व आयोजकांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो आणि यापुढेही सरकारकडून सामाजिक परिवर्तनाच्या कार्यासाठी पाठबळ दिले जाईल, याची ग्वाही देतो." या भव्य कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी समितीचे संस्थापक अध्यक्ष विशाल पुंड, स्वागत अध्यक्ष बाबुलाल जी मगर, अध्यक्ष शैलेश हेकाडे, कोषाध्यक्ष आसाराम विरकर, सरचिटणीस अशोक गोरे, तसेच सोमनाथ जाधव, गोपी इतके, सचिन जेजुरकर, नितीन खरात, पंडित कांदे, धीरज केंद्रे, श्रीकांत घुले, अशोक दामले, महेश सत्रे, महेश दुधाळकर, आकाश राऊत, रोहिणी काळे यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मेहनत घेतली. महात्मा फुले यांची ही जयंती जनतेच्या मनात त्यांच्या कार्याची आठवण करून देणारी ठरली.

द•ख•ल

## क्रांतीसुर्य महात्मा फुले युवा मंच केऱ्हाळा तर्फे महात्मा फुले जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**
**कामोठ वार्ताहर**



पनवेल महानगरपालिका हद्दीतील दरवर्षीप्रमाणे होणारी नालंदा बौद्ध विहार ट्रस्ट कामोठे आयोजित विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती महोत्सव , स्वाभिमानी भीम उत्सव 2025 चे नियोजनबद्ध आयोजन. या उत्सव निमित्ताने भीम गीतांचा आर्केस्ट्रा, स्थानिक कलाकारांचे सांस्कृतिक कार्यक्रम तसेच होणाऱ्या भव्य मिरवणुकीचे जयंतीतील भिम अनुयायांचे स्वागत ,धम्म पूजापाठ, धम्म ध्वजारोहण ,धम्म प्रवचन तसेच विविध प्रेरणादायी प्रबोधन, मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे 12 एप्रिल ते 15 एप्रिल पर्यंत या सर्व कार्यक्रमा साठी नालंदा बुद्ध विहार ट्रस्ट अध्यक्ष रवींद्र कांबळे व भारतीय बौद्ध महासभा तसेच आरपीआय आठवले गट कामोठे, बौद्धजनन पंचायत समिती सर्व शाखा, नालंदा ज्येष्ठ नागरिक संघ कामोठे,नालंदा युवा संघ तसेच संस्थेचे सर्व पदाधिकारी ,कार्यकर्ते ,सदस्य यांनी विशेष मेहनत घेतली आहे. या कार्यक्रमासाठी भीम आणि बांधव, सर्व आंबेडकरी विचारांच्या नागरिकांनी तसेच बोधिसत्व, भारतरत्न, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या 134 व्या जयंती महोत्सव निमित्ताने एकत्रित येऊन डॉ. बाबासाहेबांचे आचार, विचार ,उद्दिष्ट, सूचनाचे प्रचार करून देश व संविधान सन्मान या निष्ठेच्या उद्देशाने सर्व कामोठेकरांनी हा संदेश जनसामान्यापर्यंत पोहोचवण्यासाठी या जल्लोष आनंदउत्साहात सामील व्हावे असे विनंतीपूर्वक आव्हान आयोजकांच्या वतीने करण्यात आले करण्यात आले.

## हरितवारी उपक्रमाद्वारे "अजानवृक्ष व सीतापत्र" चे काशी विश्वेश्वर मंदिर परिसरात रोपण

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :-** सध्या राष्ट्रीय स्वयं सेवक संघांचे स्थापना शताब्दी वर्ष सुरु आहे. त्या अनुषंगाने सिल्लोड जिल्हा राष्ट्रीय स्वयं सेवक संघ शाखेच्या वतीने "शताब्दी वर्ष, शत अजाणवृक्ष" हा हिंदू धर्म संस्कृती व पर्यावरण यात मोलाचे महत्व असलेल्या "अजाणवृक्षाचे "आज धानोरा येथील काशी विश्वेश्वर महादेव मंदिराच्या प्रांगणात डॉ.संतोष पाटील यांनी हरीतवारी उपक्रमाद्वारे महंत सर्वानंद सरस्वती महाराज यांच्या हस्ते रोपण करण्यात आले.असे शंभर वृक्ष जिल्ह्यात लावून संगोपीत केले जात आहेत.सोबतच रामायनात महत्व व वर्णन असलेल्या "सीतापत्र" हा दुर्मिळ व आय यु सी एन च्या रेड लीस्ट मधील संरक्षित वृक्ष ही रोपण करण्यात आला. देवस्थानाने संगोपणाची जबाबदारी स्वीकारली आहे.१२ व्या शतकात अखंड महाराष्ट्राची माऊली संत ज्ञानेश्वर महाराज यांनी आळंदी येथे संजीवन समाधी घेतली.समाधी घेतेवेळी त्यांनी त्यांच्या हातात असणारा अजाणवृक्षा चा दंड समाधी समोर जमिनीत रोवला व त्यालाच कालांतराने पालवी फुटून विशाल अशा अजानवृक्षात रूपांतर झाले व गेली सातशे वर्ष तो सिद्ध ज्ञानवृक्ष उभा असून ते समुद्र मंथनातुन निघालेले रत्न आहे.



## कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी (म) पनवेल या संस्थेला रू. १ कोटी ५१ लाख नफा

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**



सन २०२४ - २५ या सालात कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी (म) पनवेल या संस्थेला ढोबळ उत्पन्न ८ कोटी ९६ लाख झाले. पैकी सर्व तरतुदी करून संस्थेला १ कोटी ५१ लाख निव्वळ नफा झाला. तसेच संस्थेचा निव्वळ एन.पी.ए. ०% आहे. संस्थेच्या ठेवी रू. ४८ कोटी ९७ लाख असून कर्ज वाटप वीस कोटीच्या वर आहे. संस्थेचा स्वनिधी रू. ९ कोटी ८६ लाख असून रू. ३२ कोटीची गुंतवणूक आहे.

संस्थेने केलेल्या चांगल्या कामगिरीबद्दल सन २०२४-२५ या सालाकरीता संस्थेस प्रथम क्रमांकाचा "कोकण पतसंस्था भूषण पुरस्कार" प्राप्त झाला आहे. तसेच संस्थेस "बॅंको पतसंस्था ब्ल्यू रिबन - २०२४" हा पुरस्कार ही प्राप्त झालेला आहे. गेल्या वर्षभरात अधिकारी-कर्मचाऱ्यांनी केलेल्या अथक प्रयत्नामुळे थकबाकीचे प्रमाण कमी झाले. तसेच सभासद, खातेदार आणि ठेवीदारांनी संस्थेवर विश्वास दाखविल्यानेच एवढी चांगली कामगिरी आम्ही करू शकलो. त्याबद्दल संस्थेच्या अध्यक्षा मालती चंद्रकांत आंग्रे यांनी आभार मानले असून, रायगड जिल्हयात एकमेव अग्रेसर महिला पतसंस्था असल्याचा आम्हा सर्वांना अभिमान आहे. असेच प्रेम आपण आमचे संस्थेवर ठेवावे. असेही अध्यक्षांनी आवाहन केले आहे.

## वज्र देहीच्या आरती ठोके यांच अवैध दारू विक्री विरोधात अनसिंग पोलीस स्टेशन ला निवेदन.ग्रामीण भागातील महिला पोहचल्या पोलिस स्टेशन ला.!!

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी : वाशिम**
**गजानन पवार.**

वाशीम तालुक्यांतील अनसिंग पोलिस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या टणका सोनगव्हाण अणि पांगरखेडा या गावामधे अवैध दारू विक्री चां विळखा वाढत चालल्याने महिला मध्ये तीव्र संतापाची लाट पसरली आहे.महीलाचे जीवन या दारू विक्री मुळे उद्ध्वस्त होत असल्याने वज्र देही महिला विकास संघाच्या अध्यक्ष, आरती ठोके यांच्या नेतृत्वात महिलांनी अनसिंग पोलीस ठाण्यात धडक देऊन अवैध दारू विरोधात एल्गार पुकारला आहे.अवैध दारू अड्डे त्वरीत उद्ध्वस्त करा. अन्यथा शोले स्टाइल आंदोलन छेडण्याचा इशारा आरती ठोके यांनी दिला आहे. याबाबत चे निवेदन पोलीस स्टेशनला देण्यात आले आहे. निवेदनात नमूद आहे की अवैध दारूमुळे राज्यातील गुन्हेगारी वाढली असून अलीकडच्या काळात गुन्हेगारीने कळस गाठला आहे. गुन्हेगारी मध्ये विविध जाती धर्मातील अनेक कोवळी मुले आणि तरुणी, बांड पोर या गुन्हेगारी जगताकडे आकर्षित होत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. झटपट श्रीमंतीच्या नादात व्यसनाने गुरफटलेल्या मुलांकडून अनेक प्रकारचे गुन्हे केल्या जात आहेत. महिलांच्या मंगळसूत्रापासून ते दरोड्या पर्यंत वाटणारी पासून ते खंडणीपर्यंत रडणारी गुन्हे आणि त्यातून होणारे खून हि अत्यंत चिंतनाची बाब झाली आहे व त्याचे मूळ कारण दारू आहे. वाढती गुन्हेगारी रोखण्यासाठी जशी कायदा व सुव्यवस्थेची गरज आहे तसेच अवैध




दारू विक्रीला पायबंध घालने ही सुद्धा कायदा व सुव्यवस्थेसाठी गरजेचे आहे. मात्र चित्र बघायला वेगळेच मिळत आहे. ज्याच्या खांद्यावर कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी सोपवली आहे ते पोलीसच अवैध दारू विक्रीला अभय देऊन दारूचा विळखा आणखी घट्ट आवडण्याचा डाव रचत आहेत. म्हणून अवैध दारू विक्रीला पायबंध करून गुन्हेगारी रोखण्याची जबाबदारी नेमकी कोणाची ? हा ज्वलंत प्रश्न निर्माण झाला आहे. पूर्वी दहाव्या बाराव्या वर्षी मुलाच्या हातात पुस्तक असायची आज त्याच वयाच्या कोवळ्या मुलांच्या हातात दारूची बाटली बघायला मिळत आहे. याला केवळ आणि केवळ पोलीस प्रशासन जबाबदार आहे. परिसरातील अनेक अबाल वृद्ध नागरिक तसेच महिला मुली, यांचा स्वयं कधी घडेल आणि केव्हा त्यांच्या समाज भावनेचा उद्रेक होईल. हे सांगणे कठीण होऊन बसले आहे. पोलीस प्रशासनाने त्वरित अनसिंग पोलीस स्टेशन अंतर्गत येणारी सोनगव्हाण, पांगरखेडा टनका, येथील अवैध दारू बंद करावी. अन्यथा शोले स्टाईल आंदोलन करण्याचा इशारा वज्रदेही संघटनेच्या मा, अध्यक्ष, आरती ठोके यांनी दिला आहे.

## वेश्याव्यवसाय प्रकरणी चौघांवर गुन्हा दाखल, पनवेल- नवी मुंबईत गैरप्रकार सुरूच

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

पीडित महिलांना वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडल्या प्रकरणी नारपोली, कोन येथील भूषण लॉजिंग अँड बोर्डिंगचे लॉज मॅनेजर, वेटर, लॉज चालक यांच्याविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. यातील तिघा आरोपींना अटक करण्यात आली. पनवेल, नवी मुंबई परिसरात अशाच प्रकारे लॉज, बार, आर्केष्ट्रा, स्पाच्या नावाखाली अनेक ठिकाणी गैरधंदे सुरू आहेत. पनवेल, नवी मुंबई परिसरात सर्वच लॉजवर वेश्याव्यवसाय सुरू असल्याचे पोलीस कारवाईवरून सिद्ध झाले आहे. अनेक लॉजच्या बाहेर वेश्या व्यवसाय करणाऱ्या महिला उभ्या असलेल्या दिसून येतात. पनवेल शहरातील बस स्थानक, पटवर्धन हॉस्पिटलच्या समोर अनेक वेश्या व्यवसाय करणाऱ्या महिला येणा जाणाऱ्या नागरिकांना हातवारे करत असतात. या ठिकाणी खुलेआम वेश्या व्यवसाय सुरू असतो. पोलिसांना याची माहिती असून देखील त्यांच्यावर कारवाई केली जात नाही. लॉजचे फॅड ग्रामीण भागात देखील सुरू आहे. पनवेल, नवीन पनवेल, खांदा कॉलनी, कामोठे, तळोजा, कळंबोली, खारघर या ठिकाणी काही पैसे दिल्यानंतर लॉज चालक आलेल्या ग्राहकाला मागणीनुसार वेश्या व्यवसायाचे रेट सांगतो. आणि तशी पूर्तता करतो. अनेक ठिकाणी स्पाच्या नावाखाली वेश्या व्यवसाय केला जात आहे. पनवेल तालुक्यातील नारपोली, कोन येथील भूषण लॉजिंग अँड बोर्डिंग या ठिकाणी वेश्या व्यवसाय सुरू असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाला मिळाली. 10 एप्रिल रोजी सायंकाळी सातच्या सुमारास येथील लॉज मॅनेजर किशोर गर्दे (वय 39), अभिलाष कृष्णा शेट्टी (वेटर), लोकेश देवराज गवडा (लॉज चालक) आणि शिवसागर रामप्रकाश गुप्ता (लॉज चालक) यांनी सहा पीडित महिलांना वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडले. पोलिसांनी बनावट ग्राहक पाठवून त्यांना रंगेहात पकडले. या ठिकाणाहून 4 हजार रुपये, एक पांढऱ्या रंगाचा डीव्हीआर जप्त करण्यात आला. यातील किशोर गर्दे, अभिलाष शेट्टी आणि लोकेश गौडा यांना अटक करण्यात आली आहे. तर चौथ्या आरोपीचा शोध सुरू आहे.

## भारती विद्यापीठ आय एम एस आर आणि आय एस टी डी आयोजित कार्यशाळा ..

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

**भारती विद्यापीठ इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च च्या ऑपरेशनस क्लब आणि इंडियन सोसायटी फॉर ट्रैनिंग अँड डेव्हलपमेंट नवी मुंबई आयोजित " कंपनीतील उन्हाळी प्रशिक्षण संधीचे नौकरीमध्ये कसे रुपातंरीत करता येते...." या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा दि. ०९/०४ /२०२५ आयोजित करण्यात आली होती. महाविद्यालयाच्या संचालिका डॉ. अंजली कळसे यांनी कार्यक्रमाचे उदघाटन करून ह्या नावीन्यपूर्ण उपक्रमास शुभेच्छा दिल्या.**

**अभय पटवर्धन,कॉर्पोरेट प्रशिक्षक, माजी विद्यार्थी, बी व्ही आय एम एस आर आणि आय एस टी डी, सुरत ह्यांनी प्रशिक्षणार्थीना उद्योगांची गरज ओळखून स्वतः ला**



**तयार केले पाहिजे या विषयावर मार्गदर्शन केले आणि शंकाचे निरसन केले. मुख्य आयोजक डॉ.कुलदीप भालेराव,मार्गदर्शक, ऑपरेशनस क्लब आणि सचिव,आय एस टी डी नवी मुंबई ह्यांनी भारती विद्यापीठ नवी मुंबई कॉम्प्लेक्सचे संचालक, डॉ. विलासराव कदम,महाविद्यालयाच्या संचालिका डॉ. अंजली कळसे आणि आय एस टी डी नवी मुंबईच्या अध्यक्ष डॉ.वैशाली पाटील ह्यांनी उपक्रम राबवण्यासाठी केलेल्या मार्गदर्शनासाठी आभार व्यक्त केले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी दिव्या पवार,मैथिली कोगंरे,अनिरुद्ध खोत, निखिल थोरात,अनुष्का भातखंडे,अथर्व कठले ,पुष्कराज पंडित, पार्थ चव्हाण आणि यश मुंदडा ह्या विद्यार्थ्यांनी विशेष सहकार्य केले आणि उपक्रम यशस्वी केला.**

## सणसर विकास सोसायटीनी केली 76% वसुली

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

इंदापूर तालुक्यातील एक मोठी सोसायटी म्हणून ओळखली जाणारी सणसर सोसायटीची बँक पातळीवर 31 मार्च 2025 अखेर 76% वसुली झाली असल्याची माहिती सोसायटीचे चेअरमन सुशील निंबाळकर यांनी दिली.

मागील 2 वर्षाची परिस्थिती पाहता राज्यात सर्वच सोसायट्या या अडचणीत सापडल्या असल्याचे चित्र बघायला मिळत होते. लोकसभा व विधानसभा निवडणुका नुकत्याच झाल्या असल्याने कर्जमाफी होईल अशी सामान्य सभासदांची अपेक्षा होती त्यामुळे सोसायटीचे कर्ज वसुली होत नव्हती परंतु चालू वर्षी सोसायटीचे चेअरमन सुशील निंबाळकर यांनी सोसायटीचे सचिव संजय सपकाळ तुषार निंबाळकर यांना वसुलीसाठी बँकेचे विकास अधिकारी पोरे साहेब वसुली अधिकारी अर्जुन साहेब यांचे मार्गदर्शन घेऊन त्यांना वेळी वेळी संपर्क करून त्यांच्याकडून छत्रपती कारखाना,माळेगांव कारखाना सोमेश्वर कारखाना,दौंड शुगर भुईंज व इतर बाहेरगावच्या कारखान्याकडून ऊस बिल वसूल करून जोमाने प्रयत्न करून मागील 2 वर्षा पेक्षा या वर्षी वसुलीची टक्केवारी वाढवण्यात यशस्वी ठरले असून पुढील वर्षीसुद्धा वसुली 100% करण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे सांगितले त्याच बरोबर चेअरमन सुशील निंबाळकर यांना सभासदांनी वेळोवेळी सहकार्य करण्याचे आव्हान करण्यात आले.

# रेवदंडा पारनाका येथील ग्रामदैवत हनुमान जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

पंचक्रोशीत उत्साहाचे वातावरण; जयघोष, भजन-कीर्तन आणि मारुती स्त्रोतांनी मंदिर परिसर दुमदुमला, रेवदंडा गावातील पारनाका येथील ग्रामदैवत श्री हनुमान जयंतीचा उत्सव अत्यंत भक्तिभावात आणि पारंपरिक उत्साहात साजरा करण्यात आला. पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली होती. संपूर्ण मंदिर परिसर "जय बजरंग बळी"च्या जयघोषाने आणि मारुतीच्या स्तोत्रांनी दुमदुमून गेला होता.पहाटे काकड आरतीपासून प्रारंभ झालेल्या या दिवसभराच्या सोहळ्यात मंदिर आकर्षक फुलांची सजावट, रंगीबेरंगी पताका व सुंदर रांगोळ्यांनी सजवले होते. महिला मंडळांनी विविध रंगांनी रेखाटलेल्या रांगोळ्यांनी वातावरण अधिकच भक्तिमय केले, तर युवकांनी सजावट, शिस्त व व्यवस्थापनाची जबाबदारी शस्वीपणे पार पाडली. भाविकांच्या मुखी सतत "भीमरूपी महारुद्रा वज्र हनुमान मारुती,वनारी अंजनीसुत रामदूत प्रभंजना..."असे मारुती स्तोत्र ऐकू येत होते. या स्तोत्रांनी व भक्तिगीतांनी मंदिराचा परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला होता. दर्शनासाठी लांबच लांब रांगा लागल्या होत्या. विविध भागांतून आलेल्या भाविकांनी शिस्तबद्धतेने दर्शन घेतले. दिवसभर भजन, कीर्तन, अभिषेक व महापूजन अशा धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल होती. रात्री महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते, ज्याचा हजारो भाविकांनी लाभ घेतला.गावकऱ्यांच्या पुढाकाराने आणि स्वयंसेवकांच्या सक्रिय सहभागाने संपूर्ण कार्यक्रम अतिशय सुरळीत पार पडला. एकंदरीत, हनुमान जयंतीचा हा उत्सव श्रद्धा, शिस्त आणि उत्साहाचा सुंदर संगम ठरला.







# क्रांतीसुर्य महात्मा फुले युवा मंच केऱ्हाळा तर्फे महात्मा फुले जयंती उत्साहात साजरी



**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :** क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले यांची जयंती महात्मा फुले युवा मंच, केऱ्हाळा यांच्या वतीने अत्यंत उत्साहात आणि सन्मानपूर्वक साजरी करण्यात आली.

सकाळी ८ ते ९ या वेळेत महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून गावातील प्रमुख मार्गावर प्रतिमेसह मिरवणूक काढण्यात आली. ढोल-ताशांच्या गजरात झालेल्या मिरवणुकीला गावकऱ्यांचा मोठ्या प्रमाणावर उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला

मिरवणुकीनंतर क्रांतीसुर्य महात्मा फुले प्रांगणातील सभागृहात जयंतीचा मुख्य कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केऱ्हाळा ग्रामपंचायतीच्या सरपंच सौ. उषाताई पांढरे होत्या.प्रमुख पाहुणे म्हणून सिल्लोडचे तहसीलदार मा. संजयजी भोसले, तसेच कवी, गीतकार, गायक, लेखक व दिग्दर्शक राजेंद्र सपकाळ आणि राजू आठवले उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.प्रगती इंग्लिश स्कूल, केऱ्हाळा येथील विद्यार्थिनींनी महात्मा फुले यांच्या कार्यावर अभ्यासपूर्वक व प्रभावी भाषण सादर केले.तहसीलदार संजय भोसले यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, "महात्मा फुले हे केवळ समाजसुधारक नव्हते, तर ते शिक्षणतज्ज्ञ, लेखक आणि शेतकऱ्यांचे खरे प्रतिनिधी होते. त्यांनी स्त्रीशिक्षणाला सुरुवात करून समाजाला नवा मार्ग दाखवला."त्यानंतर राजेंद्र सपकाळ यांनी महात्मा फुलेंच्या जीवनकार्यावर आधारित प्रेरणादायी कविता सादर केली, ज्याला उपस्थितांकडून भरभरून प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमास केऱ्हाळा गावातील नागरिक, युवक, महिला, सामाजिक कार्यकर्ते, राजकीय प्रतिनिधी आणि सर्वसामान्य ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी सैनिक प्रवीण पांडुरंग पवार यांची कार्यक्रमाला विशेष उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या शेवटी महात्मा फुले युवा मंच, केऱ्हाळातर्फे योगेश सांडू दारूंटे यांनी सर्व उपस्थित मान्यवर, पाहुणे व ग्रामस्थांचे मनःपूर्वक आभार मानले.

# ठाणे आता सीसीटीव्हीच्या निगराणीखाली !

## शहरात सीसीटीव्हीच्या खोदकामासाठी पालिकेकडून हिरवा सिग्नल



**ठाणे :** ठाणे शहरात गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत तब्बल ६ हजारांपेक्षा अधिक सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याच्या कामाला अखेर ठाणे महापालिकेने हिरवा सिग्नल दिला आहे. सीसीटीव्ही बसवण्यासाठी ठाणे महापालिका क्षेत्रात खोदकाम करावे लागणार असल्याने ठाणे महापालिकेच्या वतीने हरकत घेण्यात आली होती. त्यामुळे सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याच्या कामाला सुरुवात झाली नव्हती. मात्र गेल्या आठवड्यात अखेर ठाणे महापालिकेने ही परवानगी दिली असल्याने ठाणे पोलिसांचा सीसीटीव्ही बसवण्याचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे.

शहरांमधील गुन्हेगारीला आळा बसावा तसेच शहरे सुरक्षित राहावीत यासाठी संपूर्ण ठाणे पोलीस आयुक्तालय क्षेत्रात तब्बल ६ हजारांपेक्षा अधिक सीसीटीव्हीचे जाळे बसवण्याचा प्रस्ताव ठाणे पोलिसांकडून तयार करण्यात आला आहे. विशेष म्हणजे ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या क्षेत्रात येत असलेल्या इतर पालिकांनी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याच्या कामाला परवानगी दिली असताना ठाणे पालिकेकडून मात्र हिरवा कंदील मिळालेला नव्हता. ठाणे महापालिकेच्या परवानगी अभावी ठाणे पोलिसांना हे काम सुरू करता येत नव्हते. जिल्ह्यातील ठाणे, भिवंडी, उल्हासनगर, अंबरनाथ आणि बदलापूर या शहरांत ६ हजारांहून अधिक अत्याधुनिक सीसीटीव्ही कॅमेरे ठाणे पोलिसांकडून बसवण्यात येणार आहेत. शहरातील सिग्नल परिसर, मुख्य चौक, शाळा, महाविद्यालय तसेच निर्जन ठिकाणी हे कॅमेरे बसविले जाणार आहेत. या कॅमेऱ्याच्या माध्यमातून शहरातील वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्याबरोबरच गुन्हेगारीला पायबंद घालणे शक्य होणार आहे.

ठाणे, भिवंडी, उल्हासनगर, अंबरनाथ आणि बदलापूर ही शहरे ठाणे पोलीस आयुक्तालय क्षेत्रात येतात. या शहरांमध्ये एकूण ३५ पोलीस ठाणे आहेत. त्यामुळे त्या शहरांमध्ये कॅमेरे बसवण्यासाठी रस्ते खोदणे तसेच इतर कामांसाठी संबंधित महापालिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. इतर महापालिकांनी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यासाठी परवानगी यापूर्वीच पोलिसांना दिली होती. मात्र ठाणे महापालिका क्षेत्रात सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यासाठी परवानगी देण्यात आली नव्हती. खोदकाम करताना रस्त्यांचे नुकसान होऊ नये यासाठी ही परवानगी पालिकेकडून अडवून ठेवण्यात आली होती. मात्र आता ठाणे महापालिकेने देखील हिरवा कंदील दिला आहे.

### कॅमेऱ्यांची वैशिष्ट्ये...

प्रस्तावानुसार स्थिर कॅमेरे, ३६० डिग्रीमध्ये फिरणारे कॅमेरे, लांबून तसेच अंधारात वाहनांचे क्रमांक स्पष्ट दिसतील असे एएचपीआर कॅमेरे, तर वाहनांच्या वेगाची नोंद करणारे आरएलव्हीडी कॅमेरे अशा प्रकारचे अत्याधुनिक कॅमेरे बसविण्यात येणार असून ते ठाणे पोलिसांच्या नियंत्रण कक्षाला जोडण्यात येणार आहेत. त्यामुळे पोलिसांना नियंत्रण कक्षात बसून संपूर्ण शहरातील गुन्हेगारीवर तसेच वाहतूक कोंडीवर लक्ष ठेवणे शक्य होणार आहे.

### कोणत्या भागात किती कॅमेरे

| शहरे | ठिकाणे | सीसीटीव्हींची संख्या |
|---|---|---|
| ठाणे ते दिवा | ९१७ | ३१६३ |
| भिवंडी | ५५५ | १,३४७ |
| उल्हासनगर ते बदलापूर | ५२५ | १,५४१ |
| एकूण | १९९७ | ६०५१ |

# बाबासाहेबांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण

## भीमज्योतीने उजळली सुभाष टेकडी



**उल्हासनगर :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य पूर्णाकृती पुतळ्याच्या अनावरणाने सुभाष टेकडी परिसर अभूतपूर्व उत्साहात न्हाऊन निघाला होता. बौद्ध धर्मगुरू भन्ते आनंद महाथेरो यांच्या हस्ते आणि आमदार डॉ. बालाजी किणीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत गुरुवारी हा सोहळा पार पडला.

आंबेडकरी चळवळीचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या उल्हासनगर-४ मधील सुभाष टेकडी येथे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण मोठ्या जल्लोषात व शिस्तबद्धतेने पार पडले. या सोहळ्यास हजारोंच्या संख्येने नागरिकांनी गर्दी केली होती. या ठिकाणी यापूर्वी अर्धपुतळा होता. मात्र, पूर्णाकृती पुतळा उभारण्याची मागणी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा स्मारक समिती'चे अध्यक्ष अरुण कांबळे, महासचिव भाई रोकडे, माजी नगरसेवक प्रमोद टाले, प्रशांत धांडे, संजय वाघमारे यांच्यासह इतर पदाधिकाऱ्यांनी आमदार बालाजी किणीकर यांच्याकडे केली होती. उल्हासनगर महापालिकेच्या वतीने सहाय्यक आयुक्त गणेश शिंपी, नगररचना सहायक संचालक ललित खोब्रागडे उपस्थित होते.

### रंगीबेरंगी फुले, रोषणाईची सजावट

अनावरण सोहळ्याच्या दिवशी सुभाष टेकडी परिसर रंगीबेरंगी फुलांनी, रोषणाईने आणि जयभीमच्या घोषणांनी गजबजून गेला होता. भीम अनुयायी, महिलांचा जल्लोष, विविध पक्षांचे लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्थांचे प्रमुख, माजी नगरसेवक आणि नागरिक मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते.

# पाणी द्या हो पाणी द्या. अनसिंग येथील नागरिकांचे पाण्यासाठी ग्रामपंचायतला निवेदन.

### येत्या 3 दिवसात पाणी पुरवठा सुरू न केल्यास घागर मोर्चा काढण्याचा इशारा.

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार.**



वाशिम तालुक्यात अनसिंग येथील प्रभाग क्रं. 4 सिताबर्डी प्लॉट येथील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी पायपीट करावी लागत असल्याने त्यांनी दि. 11 एप्रिल रोजी ग्राम पंचायत निवेदन देवून नियमीत व सुरळीत पाणी पुरवठा करण्याची मागणी केली आहे.

त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, प्रभाग क्रमांक 4 सिताबर्डी प्लॉट येथे गेल्या कित्येक दिवसापासुन नळाला व विहीरीला ग्राम पंचायत मार्फत पाणी पुरवठा केला जात नसल्यामुळे पाण्याची समस्या निर्माण झाली आहे.

पाच वर्षा अगोदर सौ. सिंधुताई सातव यांच्या कार्यकाळात अनसिंग नागरीकांना पाण्याचा कुठल्याची प्रकारचा त्रास झाला नाही तसेच त्याप्रमाणे सुरळीत पाणीपुरवठा अनसिंगच्या नागरीकांना कधी होणार? असा प्रश्न उपस्थित करुन पाणी पुरवठा सुरळीत करून देण्याची मागणी करण्यात आली आहे. येत्या तीन दिवसात पाणीपुरवठा सुरळीतपणे सुरु केल्यास ग्राम पंचायतवर घागर मोर्चा काढणार असल्याचे त्यांनी निवेदनात म्हटले आहे. निवेदनावर विठ्ठल सातव,यश चव्हाण, विलास राठोड, महेश डोईजड यांच्यासह नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत..

# डासांमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात

### आगरी कोळी सेनेकडून उपाययोजनेची मागणी

**वसई :** वसई पश्चिम येथील नाल्यातील दूषित पाण्यामुळे डासांची संख्या वाढल्याने येथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. डासांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर वाढला आहे, त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. या प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी आगरी कोळी सेनेने नवघर-माणिकपूर प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त मनोज वनमाळी यांना भेटून त्यांना मच्छरदाणी, मच्छर अगरबत्ती आणि मच्छर मारणारे बॅट्स भेट देऊन, नागरिकांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

नवघर माणिकपूर परिसरातील गवत आणि झाडाझुडपांमुळे नागरिकांमध्ये नाराजी वाढली आहे. तसेच, परिसरातील सांडपाणी अनेक ठिकाणी थेट वसई खाडीमध्ये येत असल्यामुळे नदीचे प्रदूषण वाढले आहे. सोसायटीतून वाहून आलेला कचरा साचल्याने डासांची संख्या वाढली आहे. यामुळे सनसिटी, खाडीकिनारा आणि आसपासच्या परिसरातील नागरिकांना त्रास होतो असल्याचे नागरिकांनी सांगितले.



# अखेर खातीवली उड्डाणपुलाचे काम सुरू

### आठ वर्षांच्या पाठपुराव्याला आले यश

**शहापूर :** मुंबई - नाशिक महामार्गचे चौपादरीकरण झाल्यापासून चर्चेत असलेला खातीवली - वाशिंद चौफुलीवरील रखडलेल्या उड्डाणपुलाच्या बांधकामाला खातीवली, वाशिंद गावातील सामाजिक कार्यकर्त्यांच्या पाठपुराव्यामुळे तब्बल आठ वर्षांनी सुरुवात झाली आहे. महामार्ग प्रशासनाने खातीवली येथील चौफुलीवर उड्डाणपुलाचे काम सुरू केल्याने येथील ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे.

खातीवली येथील शुभवस्तू गृहसंकुल येथील महामार्ग चौफुलीवरील महत्त्वपूर्ण असलेला उड्डाणपूल सोडून इतर सर्व कामे मागील वर्षी सुरू झाली होती. मात्र महामार्ग प्रशासन व कंत्राटदाराकडून खातीवली उड्डाणपुलाबाबत निरुत्साही धोरण असल्याने खातीवलीचे माजी उपसरपंच साईप्रसाद काबाडी, ग्रामस्थ प्रशांत महाजन, एकनाथ तारमले, वाशिंद येथील सामाजिक कार्यकर्ते संजय सुरळके यांनी अनेक वर्षांपासून महामार्ग प्रशासनासोबत पाठपुरावा सुरूच ठेवला होता. आंदोलन, उपोषण, पत्र व्यवहार याद्वारे सुरू असलेल्या पाठपुराव्याला आता यश आले आहे. महामार्ग प्रशासनाने खातीवली-वाशिंद येथील चौफुलीवर उड्डाणपूल बांधण्याचा शुभारंभ केला आहे. हे काम वेळेत काम पूर्ण झाले तर महामार्गावर होणाऱ्या अपघाताचे प्रमाण कमी होईल.

# कर्करोग आजाराला प्रतिबंध करण्यासाठी आरोग्य विभागाची विविध उपाययोजना – डॉ. प्रियांका साळुंखे

### नागोठणे येथे कॅन्सर डायग्नोस्टिक व्हॅन ; 127 जणांनी केली तपासणी

**दैनिक युवक आधार**
**नागोठणे वार्ताहर**




प्राथमिक आरोग्य केंद्रात शनिवार 12 एप्रिल रोजी सकाळी 09.00 ते संध्याकाळी 05.00 या वेळात महाराष्ट्र शासनाच्या अंतर्गत व रायगड जिल्हा परिषदेच्या आरोग्य सेवा विभागाच्या वतीने कॅन्सर तपासणी व्हॅन उपलब्ध करून रोहा तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रियांका साळुंखे,नागोठणे प्रा.आ.केंद्र वैद्यकीय अधिकारी डॉ.आदित्य शिरसाट यांच्या उपस्थितीत 127 जणांची तपासणी करण्यात आली. यावेळी कर्करोग (कॅन्सर) आजाराला प्रतिबंध करण्यासाठी आरोग्य विभागाची विविध उपाययोजना राबवित असल्याची माहिती डॉ.प्रियांका साळुंखे यांनी दिली. सदरील शिबीर हे जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या आदेशानुसार होणाऱ्या या कॅन्सर (कर्करोग) तपासणी व्हॅन मधील शिबिरात मार्फत सदरील आजार होऊ नये म्हणून कोणती काळजी घ्यावी, आजार आटोक्यात राहण्यासाठी वेळीच उपचार करून घेण्यासाठी राज्य शासनाने कॅन्सर डायग्नोस्टिक व्हॅन मधून पुरुष व महिला यांची मुखपूर्व कर्करोग तपासणी व महिलांसाठी स्तनाचा कर्करोग व गर्भाशय मुखापाशी असलेला पूर्व कर्करोग तपासणी करण्याचे आयोजन केले आहे. या शिबिरात दंत शल्य चिकित्सक डॉ प्रथमेश रवींद्र बुधे यांनी पुरुष व महिलांची मुख पूर्व कर्क रोग तपासणी केली.तर डॉ भूमी शेट्टी यांनी स्तन कर्करोग व गर्भाशय मुखापाशी असलेला पूर्व कर्करोग तपासणी केली.सदरील शिबिराचा 127 जणांनी लाभ घेतल्याची माहिती डॉ.सिरसाट यांनी दिली. अधिक माहिती देताना तालुका आरोग्य अधिकारी डॉ.प्रियांका साळुंखे यांनी गेल्या काही वर्षात कर्करोगाच्या रुग्णांमध्ये मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे या आजाराला प्रतिबंध करण्यासाठी आरोग्य यंत्रणांनी विविध उपाययोजना राबविण्यास सुरुवात केली आहे, राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे राज्यात कर्करोग तपासणी करिता डायग्नोस्टिक कॅन्सर व्हॅन कार्यान्वित करण्यात आल्या आहेत, या तपासणी (स्क्रिनिंग) चे निदान जिल्हा रुग्णालयात होणार असून एखाद्या व्यक्तीला हा आजार झाल्याचे आढळून आल्यास त्याला पुढील उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात पाठविण्यात येणार असल्याचे सांगून या शिबिराचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घेण्याचे आवाहन शेवटी डॉ.प्रियांका साळुंखे यांनी केले.

# पायोनिअर प्रिमियर लिग 2025 क्रिकेट स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंच्या टी-शर्टचे करण्यात आले अनावरण

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर) :**

पनवेल शहरातील सुप्रसिद्ध अशा अभिनव युवक मित्र मंडळाच्या माध्यमातून विभागातील सर्व आजी-माजी क्रिकेटपटूंसाठी पायोनिअर प्रिमियर लिग 2025 या क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंच्या टी-शर्टचे अनावरण केशवस्मृती पतपेढीचे अध्यक्ष अमित ओझे, मंडळाचे कार्याध्यक्ष नितीन पाटील व रायगड प्रेस क्लबचे सल्लागार संजय कदम यांच्या हस्ते करण्यात आले.

पायोनिअर विभागात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात एकूण 4 संघ या स्पर्धेत सहभागी होणार आहेत. त्यामध्ये पायोनिअर किंग कर्णधार अल्पेश पाडावे, पायोनिअर टायगर्स कर्णधार मयुर चिटणीस, पायोनिअर मराठा कर्णधार शैलेश कदम व पायोनिअर पँथर्स कर्णधार राजा चव्हाण असे आहेत. या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंच्या टी-शर्टचे अनावरण केशवस्मृती पतपेढीचे अध्यक्ष अमित ओझे, मंडळाचे कार्याध्यक्ष नितीन पाटील व रायगड प्रेस क्लबचे सल्लागार संजय कदम यांच्या हस्ते व मोठ्या प्रमाणात सहभागी झालेल्या खेळाडूंच्या उपस्थितीत करण्यात आले. सदर स्पर्धा ही हनुमान जयंतीचे औचित्य साधून 12 एप्रिल रोजी सुकापूर येथील सॉकर सिटी येथे सायंकाळी 6 वाजता होणार आहे. प्रथम पारितोषिक आकर्षक चषक, द्वितीय पारितोषिक सुंदर चषक, उत्कृष्ट फलंजदा, उत्कृष्ट गोलंदाज, उत्कृष्ट क्षेत्ररक्षण आणि इतर बक्षिसांचे वाटप यावेळी होणार असल्याने ही स्पर्धा मोठी रंगतदार बनणार आहे व अनेक दिग्गज, नावाजलेले खेळाडू या स्पर्धेत खेळणार असल्याने त्यांच्या खेळाची नजाकत सुद्धा उपस्थित प्रेक्षकांसाठी नजराणा ठरणार आहे. त्यामुळे या स्पर्धेला मोठे महत्व प्राप्त झाले आहे.




फोटो : पायोनिअर प्रिमियर लिग 2025 क्रिकेट स्पर्धेत सहभागी खेळाडू

# नवखंडेनाथ महाराजांच्या उत्सवानिमित्त पाईट येथे धावले ३५०बैलगाडे. बाळासाहेब शिवेकर; सुदाम कोळेकर यांचे बैलगाडे ठरले घाटाचा राजा.

**दैनिक युवक आधार**
**राजगुरुनगरः**



पाईट (ताः खेड) येथे नवखंडेनाथ महाराजांच्या उत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या बैलगाडा शैर्यतीत पहिल्या दिवशी बाळासाहेब दत्तात्रय शिवेकर ११.९ सेकंद तर दुसऱ्या दिवशी सुदाम निवृती कोळेकर ११:२३ सेकंदात येतं गाडे घाटाचा राजा किताबाचा मानकरी ठरले. यात्रेच्या निमित्तानं ग्रामस्थांनी एकत्र येत हारतुरे मांडवट हाळ्याची मिरवणूक काढत आर्पन केले. संध्याकाळी मनोरंजनासाठी दत्ता महाडिक पुणेकर यांच्या लोकनाट्य तमाशाचा कार्यक्रम संपन्न झाला. तर गुरुवारी (दि.१०) रोजी दुपारी ४ वाजता जिल्हा परिषद प्राथमिक शाळेसमोरील मैदानात लाल मातीतील कुस्त्यांचा जंगी आखाडा पार पडला. रोख स्वरुपात तर मानाची नवखंडेनाथ केसरी ही चांदीची गदा व बक्षिसे देण्यात आली.यावेळी मंदीर परिसरात खाद्यपदार्था सह विविध प्रकारची दुकाने थाटली होती. खेळणी पाळणे या सारखी दुकाने थाटली होती.

यात्रेच्या दरम्यान दोन दिवस सुरू असलेल्या बैलगाडा शर्यतीत सुमारे ३५० हून अधिक बैलगाडा मालकांनी सहभाग घेत बैलगाडे धावले.

फायनल शर्यतीत क्रमांक विभागून देण्यात आले. पहिल्या दिवशी पायनल मध्येप्रथम क्रमांक बाळासाहेब दत्तात्रय शिवेकर, निलेश आण्णासाहेब वाळुंज व काळभैरवनाथ बैलगाडा संघटना करंजविहिरे,दुसरा क्रमांक संदीप भोकसे, साईनाथ भोकसे व शरद चोरघे बैलगाडा संघटना पंकज दौंडकर जुगलबंदी यांच्या गाड्याने पटकवला. तिसरा क्रमांक अनिल डांगले, स्वर्गीय किसन हरी डांगले व ज्ञानेश्वर दामोदर गाडे यांच्या गाड्याने पटकवला. तर चौथा क्रमांक रुद्र दत्तात्रय गारगोटे, हौशीराम सातपुते व विवांश केतन महाले यांच्या गाड्याने पटकवला.

दुसऱ्या दिवशी फायनल मध्ये प्रथम क्रमांक सुदाम निवृती कोळेकर, मल्हारी शिवेकर व अशोक विठ्ठलराव पचपिंड, काळभैरवनाथ बैलगाडा संघटना यांच्या गाड्याने पटकवला. दुसरा क्रमांक विश्वास शिवेकर, वेदांत अमोल सावंत, व हिंद केसरी मोरा ग्रुप यांच्या गाड्याने पटकवला. तिसरा क्रमांक बबन सावळेराम कदम व ज्ञानेश्वर संभाजी राळे यांच्या गाड्याने पटकवला. चौथा क्रमांक गणपत बाबुराव पोटवडे यांच्या गाड्याने पटकवला. प्रथम क्रमांकात २४ गाडे पळाले दुसऱ्या क्रमांकात ७३ गाडे पळाले तर तिसऱ्या क्रमांकात ८५ गाडे पळाले. चौथ्या क्रमांकात २८ गाडे, पाचव्या क्रमांकात २२ गाडे पळाले. यात्रा यशस्वी करण्यासाठी सरपंच, उपसरपंच, चेअरमन, ग्रामपंचायत सदस्य, सोसायटी संचालक, विविध संस्थांचे पदाधिकारी, गावातील सर्व तरुण मंडळे, पुणेकर, मुंबईकर, ग्रामस्थांनी परिश्रम घेतले. "खेड तालुक्याच्या पश्चिम भागातील सर्वात मोठी यात्रा पाईट येथे नवखंडेनाथ महाराजांच्या उत्सवानिमित्त भरते. यात्रेच्या निमित्ताने दोन दिवस बैलगाडा शर्यती असतात तर लाल मातीतील कुस्त्यांचे आयोजन केले जाते. चौथ्या दिवशी देवाची दंडवते असतात. तालुक्यातील सर्व ग्रामस्थ बैलगाडा प्रेमी, मल्ल या यात्रेत सहभागी होतात." या कुस्ती आखाड्याला विशेषता सामाजिक कार्यकर्ते श्री भगवान शेठ पोखरकर (शिवसेना जिल्हाप्रमुख, माजी सभापती पंचायत समिती खेड, सदस्य जिल्हा नियोजन समिती पुणे) यांच्या हस्ते मानाची कुस्ती लावण्यात आली.

अतिशय आनंदी वातावरणात कार्यक्रमाची सांगता झाली

# नवीन पनवेल येथे विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती महोत्सवाचे शानदार आयोजन

### १४ एप्रिल रोजी आनंद शिंदे तर १५ एप्रिल रोजी साजन विशाल यांचा भीम गीतांचा बहारदार कार्यक्रम

**दैनिक युवक आधार**
**पनवेल(आनंद पवार)**

नवीन पनवेल येथे विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा १३४ वा जयंती महोत्सव (दि. १० एप्रिल ते १५) एप्रिल दरम्यान डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती नवीन पनवेलच्या वतीने आयोजित करण्यात आला आहे.सालाबाद प्रमाणे यंदाही पनवेल महानगरपालिकेचे माजी नगरसेवक तथा आंबेडकर चळवळीचे धडाडीचे कार्यकर्ते प्रकाश बिनेदार यांनी जयंती महोत्सवाचे शानदार आयोजन केले आहे.नवीन पनवेल येथील बिनेदार कॉर्नर जवळ असलेल्या आम्रपाली बुध्द विहार,सेक्टर ०९,व सिडको क्रिडांगण, बिनेदार मैदान,शिवा कॉम्पलेक्स जवळील सेक्टर ०२,नवीन पनवेल येथील या दोन्ही ठिकाणी साजरा होत आहे.

या जयंती महोत्सवा निमित्तानेआम्रपाली बुध्द विहार,सेक्टर ०९, बिनेदार कॉर्नर जवळ, नवीन पनवेल. या ठिकाणी १० एप्रिल ते १३ एप्रिल २५ दरम्यान विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. तसेच सोमवार दि.१४ एप्रिल रोजी सकाळी १० वा.धम्म ध्वजारोहण व बुध्दवंदना बौध्दाचार्य अशोक मिसाळ यांच्या हस्ते होणार आहे. त्यानंतर कल्पेश कांबळे (केंद्रीय शिक्षक भा.बौ. महासभा) यांचे जाहीर धम्म प्रवचन होऊन स्पर्धेचा बक्षीस समारंभ झाल्यानंतर स्नेहभोजनाचा कार्यक्रम आयोजित केलेला आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षा स्वाती बिनेदार आहेत. त्याच दिवशी १४ एप्रिल सायंकाळी ६ वा.महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध ख्यातनाम गायक आनंद शिंदे आणि पार्टी यांचा बुध्द-भीम गीतांचा बहारदार कार्यक्रम सिडको क्रिडांगण, बिनेदार मैदान,सेक्टर ०२, (अंबेमाता मंदिरा शेजारी,शिवा कॉम्पेक्स जवळ) नवीन पनवेल. या ठिकाणी आयोजित केलेला आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष यश बिनेदार हे आहेत. तसेच त्याच मैदानावर मंगळवार दि. १५ एप्रिल २५ रोजी, सायंकाळी ६ वा.महाराष्ट्राचे सुप्रसिध्द महागायक विशाल- साजन यांचाही बुध्द-भीम गीतांचा बहारदार कार्यक्रम आयोजित केलेला आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार श्याम साळवी हे आहेत. या कार्यक्रमात सामाजिक,सांस्कृतिक, कला-क्रिडा व राजकीय क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी केलेल्या मान्यवरांचा सत्कार करुन "भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार"देऊन गौरवण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांकडून देण्यात आली. अशा या भरगच्च कार्यक्रमास सर्वांनी उपस्थित राहून कार्यक्रमाचा आनंद लुटावा. असे आवाहन कार्यक्रमाचे आयोजक माजी नगरसेवक ॲड. प्रकाश बिनेदार यांनी केले आहे.

## निवडक

### हत्या प्रकरणातील आरोपीला यूपीतून अटक

**भिवंडी :** उत्तर प्रदेशमधील जागेच्या वादातून भिवंडीत २०२० साली सत्तार मन्सूरीवर गोळीबार करून त्याची हत्या करणारा फरार आरोपी साजनला शांतीनगर पोलीस पथकाने उत्तर प्रदेशातील प्रयागराजमधील फुलपूर गावातून अटक केल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनायक गायकवाड यांनी दिली. साजन उर्फ बाबर मुमताज अहमद मन्सूरी (२५) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याच्या अन्य तीन साथीदारांना यापूर्वीच अटक केलेली आहे. सत्तार मन्सूरी असे हत्या झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. जागेच्या वादातून ही हत्या झाल्याचे पोलिसांनी सांगितले. पोलिसांनी सापळा रचून या आरोपीला उत्तरप्रदेशातून अटक केली.

### गायीच्या जातीच्या २६ जनावरांची सुटका

**नांदेड :** नांदेड जिल्ह्यातील मरखेल, अर्धापूर व रामतीर्थ ठाणे हद्दीत दोन वाहनांतून कत्तल खान्याकडे घेऊन जाणाऱ्या गोवंश जातीच्या २६ जनावरांची पोलीसांनी सुटका केली. एकूण ११ लाख ५३ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, तिघांना ताब्यात घेतले आहे. दरम्यान, या प्रकरणी मरखेल ठाण्यात प्रदीप चव्हाण (टेम्पो चालक), तर अर्धापूर ठाण्यात बबन चव्हाण, रामतीर्थ ठाण्यात खलिद नबीसाब शेख यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### खानंद गावाला मदत

**कर्जत :** कर्जत तालुक्यातील आदिवासी भागात असलेल्या खानंद येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य तसेच या आदिवासी वाडीमधील लोकांसाठी किराणा साहित्य आणि वृध्द लोकांना चप्पल भेट देण्यात आली. नवी मुंबई येथील श्री साई ट्रस्ट आणि टू वरशिप संस्था यांच्याकडून ही मदत करण्यात आली. टू वरशिप मुंबई आणि श्री साई ट्रस्ट नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खानंद येथे कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

### उपचाराअभावी शाळकरी मुलाचा मृत्यू?

**अलिबाग :** म्हसळा तालुक्यामधील घूम गावातील सातवीमध्ये शिकणाऱ्या गर्वांग गायकर या मुलाचा मृत्यू झाल्याची घटना रविवार सकाळी उघडकीस आली. या मृत्यूला माणगाव उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टर जबाबदार असल्याचा आरोप त्याचा कुटुंबीयांनी केला आहे. घटनेची माहिती मिळताच शेकाप जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील, म्हसळा तालुका चिटणीस संतोष पाटील, श्रीवर्धन तालुका चिटणीस विश्वास तोडणकर व इतर कार्यकर्ते यांनी गायकर कुटुंबियांची सांत्वनपर भेट घेतली. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# कांदा दरातील घसरण सुरूच!

## लासलगाव बाजार समितीत सरासरी दर ९०० रुपयांपर्यंत



**लासलगाव :** येथील लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीत लाल कांद्याची आवक संपुष्टात येत असताना कांद्याचे सरासरी बाजार भाव चार आकडीवरून तीन आकडीवर म्हणजे हजार रुपयांच्या आत ९०० रुपयांपर्यंत कोसळल्याने कांदा उत्पादक शेतकऱ्यांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. दररोज कांद्याच्या बाजारभावात घसरण होत असल्याने या बाजार भावातून उत्पादन खर्चही निघणे कठीण झाल्याने कांदा उत्पादकांतून संताप व्यक्त होत आहे.

लासलगाव बाजार समितीत शुक्रवारी अवघ्या २१ वाहनांतून ३१५ क्विंटल लाल कांदा विक्रीसाठी आला होता. कांद्याला किमान ४००, कमाल ११११ रुपये, तर सरासरी ९०० रुपये प्रतिक्विंटल भाव मिळाला. तर ११४१ वाहनांतून २० हजार ४७५ क्विंटल उन्हाळ कांदा विक्रीसाठी आला. या कांद्याला किमान ८००, कमाल १३८१ रुपये, सरासरी १२५० रुपये प्रतिक्विंटल भाव मिळाला. कांदा भावातील घसरण गेल्या काही दिवसांपासून सुरूच आहे. त्यामुळे उत्पादक शेतकऱ्यांच्या डोळ्यांत पाणी आले आहे. या दरातून शेतकऱ्यांना उत्पादन खर्चही मिळत नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीत कांद्याची आवक घटल्याचा परिणाम दरावर झाला आहे.

> कांदा बाजार भाव घसरण रोखण्यासाठी कांद्यावरील २० टक्के निर्यात शुल्क हटवण्याची मागणी संसदेत लावून धरल्यानंतर ही मागणी मान्य होऊन २० टक्के निर्यात शुल्क हटवण्यात आले तरी कांद्याच्या बाजारभावात घसरण थांबण्याचे नाव घेत नाही. त्यामुळे आता नाफेड, एनसीसीएफमार्फत कांद्याची खरेदी थेट बाजार समितीतून व्यापाऱ्यांशी स्पर्धा करत केली तर नक्कीच कांदा बाजारभावातील घसरण थांबण्यासाठी मदत मिळेल. यासाठी मी नाफेडचे एमडी व अध्यक्ष यांची भेट घेणार आहे.
>
> **- खासदार भास्कर भगरे,** दिंडोरी लोकसभा मतदारसंघ

### बाजार समितीच्या सभापतीपदी ज्ञानेश्वर जगताप



लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतीपदी ज्ञानेश्वर किसन जगताप यांची, तर उपसभापतीपदी संदीप दरेकर यांची बिनविरोध निवड झाली. राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांच्या सूचनेचे सदस्य मंडळाने पालन केल्याने निवडणूक प्रक्रिया बिनविरोध पार पडली. सभापती पदासाठी ज्ञानेश्वर जगताप यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची सभापतीपदी बिनविरोध निवड झाल्याचे घोषित करण्यात आले. उपसभापती पदासाठी संदीप दरेकर व राजेंद्र बोरगुडे यांचे दोन अर्ज दाखल झाले. मात्र भुजबळ यांच्या सूचनेनुसार दिलीप खैरे यांनी दोन्ही गटातील प्रमुख जयदत्त होळकर व पंढरीनाथ थोरे यांच्या सदस्य मंडळाशी चर्चा केली. त्यानंतर राजेंद्र बोरगुडे यांनी माघार घेतल्याने दरेकर यांची उपसभापती पदी बिनविरोध निवड करण्यात आली.

> कांद्याच्या बाजारभावात दररोज घसरण होत असल्याने ही घसरण थांबवण्यासाठी जास्तीत जास्त कांदा कसा निर्यात होईल यासाठी निर्यातीला प्रोत्साहनपर सबसिडी देण्यासाठी केंद्र व राज्य सरकारकडे लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून पाठपुरावा करणार आहे.
>
> **- ज्ञानेश्वर (डी के) जगताप,** सभापती, लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समिती

> कांद्याला मिळणाऱ्या सरासरी बाजारभावातून उत्पादन खर्चही निघणे कठीण झाले आहे. त्यामुळे केंद्र व राज्य सरकारने दोन हजार रुपयांच्या आत विक्री झालेल्या व विक्री होणाऱ्या कांद्याला प्रति क्विंटलला एक हजार रुपये अनुदान द्यावे. जेणेकरून उत्पादन खर्च भरून निघेल व उर्वरित पैशांत कुटुंबाचा उदरनिर्वाह करता येईल.
>
> **- निवृत्ती न्याहारकर,** कांदा उत्पादक शेतकरी, चांदवड

# पाणीटंचाई आराखडा तयार करावा!

## मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांचे निर्देश

**कराड :** महाबळेश्वर, वाई व खंडाळा तालुक्यांत संभाव्य पाणीटंचाई भासू शकते. याचा विचार करून तालुकास्तरीय प्रशासनाने पाणीटंचाई आराखडा तयार करावा. टंचाईसदृश गावांमध्ये टँकरच्या माध्यमातून पिण्याचा पाणीपुरवठा करून पाणी कमी पडून देऊ नका, असे निर्देश मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांनी दिले.

वाईच्या प्रशासकीय इमारतीमध्ये वाई, महाबळेश्वर व खंडाळा तालुक्यांतील पाणीटंचाई परिस्थिती व प्रशासकीय कामकाज आढावा बैठक शुक्रवारी दुपारी मदत व पुनर्वसन मंत्री पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीला वाईचे प्रातांधिकारी राजेंद्र कचरे, तहसीलदार सोनाली मेटकरी, महाबळेश्वर तहसीलदार तेजस्विनी पाटील, खंडाळा तहसीलदार अजित पाटील यांच्यासह वाई, खंडाळा महाबळेश्वर तालुक्यांतील गट विकास अधिकारी, पाणीपुरवठा योजनेचे अधिकारी तसेच आदी कार्यान्वयन यंत्रणांच्या प्रमुखांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी क्रांतिसूर्य महात्मा जोतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून मंत्री मकरंद पाटील यांनी अभिवादन केले.

वाई, महाबळेश्वर, खंडाळा तालुक्यांत तीव्र टंचाई भासणार नाही, असे सांगून पाटील म्हणाले की, गेल्या वर्षी पाऊस चांगला झाला, परंतु महाबळेश्वरला नेहमीपेक्षा कमी झाला. एकूणच उन्हाळ्याच्या वाढलेल्या तीव्रतेमुळे येथील तापमान मोठ्या प्रमाणामध्ये वाढले आहे. उन्हाळ्याच्या तीव्रतेमुळे पाण्याच्या समस्या निर्माण होतात. विहिरीतील पाण्याची पातळी घटते व पाण्याचा उपसाही अधिक होतो. शेतीला अधिकचे पाणी द्यायला लागते. बाष्पीभवनामुळे व इतर वापरामुळे धरणांमधल्या पाण्याची पातळीही खाली जात असते. टंचाईमध्ये येण्याची शक्यता असणाऱ्या गावांवर लक्ष ठेवून त्या गावांना लागणाऱ्या उपाययोजना कराव्यात. या गावांची जर टँकरची मागणी असेल तर स्थळ पाहणी करून या गावांना टँकरने पाणीपुरवठा करून इतर उपाययोजना कराव्यात. तसेच पाणीपुरवठा व जलजीवन मिशनची प्रगतिपथावर असणारी कामे टंचाईपूर्वी पूर्ण करावी, अशा सूचनाही मंत्री पाटील यांनी दिल्या.

यावेळी मंत्री पाटील यांनी अपुऱ्या पाणीपुरवठा योजनांबरोबर धोम डावा व उजवा कालव्याच्या पाण्याची आवर्तने, जललक्ष्मी, कवठेकेंजळ योजनेचा आढावा घेतला. अपूर्ण कामे असलेल्या ठिकाणी कंत्राटदारांची बैठक घेऊन कामे वेळेत पूर्ण करा, अशा सूचना यावेळी केल्या.



### लाभार्थ्यांना दाखल्यांचे वाटप

१०० दिवस कृती आरोखड्यानुसार महसूल विभागाने केलेल्या कामांचा आढावा घेऊन लक्ष्मीयोजना, गोपीनाथ मुंडे अपघात योजना, संजय गांधी निराधार योजना, अंत्योदय व प्राधान्य कुटुंब योजनेच्या कातकरी समाजातील लाभार्थ्यांना प्रमाणपत्राचे व दाखल्यांचे वाटप मंत्री पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. कृषी विभागाच्या विविध योजनांची माहिती व्हावी यासाठी कृषी विभागाने तयार केलेल्या क्युआर कोड ॲपचे अनावरणही पाटील यांच्या हस्ते झाले.

# पहिल्या शाळेसंदर्भात उदयनराजेंचे वक्तव्य दुर्दैवी



**हर्षवर्धन सपकाळ यांची टीका**

**पुणे :** पहिल्या शाळेसंदर्भात खासदार उदयनराजेंनी केलेले वक्तव्य दुर्दैवी आणि खोडसाळपणाचे आहे. सरकार या माध्यमातून इतिहास पुसण्याचे काम करत आहे, अशी टीका काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली. मागील काही दिवसांपासून छत्रपतींच्या घराण्यातील खासदार उदयनराजे आणि मंत्री शिवेंद्रसिंहराजे हे ज्यांनी इतिहासाला काळीमा फासण्याचे काम केले, त्यांची पाठराखण करत आहे, असेही सपकाळ म्हणाले.

महात्मा जोतिबा फुले यांच्या जयंतिनिमित्त सपकाळ यांनी समता भूमी येथे जाऊन फुले दाम्पत्याच्या पुतळ्यास अभिवादन केले. यानंतर काँग्रेस भवनमध्ये आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. मागील काही दिवसांपासून छत्रपतींच्या घराण्यातील खासदार उदयनराजे आणि मंत्री शिवेंद्रसिंहराजे हे ज्यांनी इतिहासाला काळीमा फासण्याचे काम केले, त्यांची पाठराखण करत आहेत.

छत्रपती शिवाजी महाराज यांची समाधी आणि त्यांचा इतिहास लोकांपर्यंत पोहचण्यात महात्मा फुले यांचे योगदान मोठे आहे. त्यांनी भारतात समतावादी विचार रुजविले, असे सपकाळ म्हणाले.

# महात्मा फुलेंना शिक्षणातून बौद्धिक, सामाजिक विकास अभिप्रेत

## डॉ. श्यामसुंदर मिरजकर यांचे प्रतिपादन



**कोल्हापूर :** महात्मा फुलेंचे शैक्षणिक कार्य व विचार केवळ अक्षर ओळख व अंकगणित इतक्या पुरते मर्यादित नव्हते, त्यांचे शिक्षण हे बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना बौद्धिक, सामाजिक, नैतिक विकास आणि आत्मसन्मान देणारे होते, असे प्रतिपादन डॉ. श्यामसुंदर मिरजकर यांनी शुक्रवारी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्यावतीने सुरू असलेल्या फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहाच्या तिसऱ्या दिवशी महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या ऑनलाईन व्याख्यानात ते बोलत होते.

डॉ. मिरजकर म्हणाले की, बौद्धिक स्तरावर कोणीही श्रेष्ठ अथवा कनिष्ठ नाही. त्यामुळे सर्वांना शिक्षण घेण्याचा अधिकार मिळाला पाहिजे. त्यासाठी हंटर कमिशन पुढे साक्ष देताना ब्रिटीश सरकारने प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले पाहिजे, बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली पाहिजे, अशी मागणी निवेदनाद्वारे महात्मा फुले यांनी केली. बहुजन समाजातील विद्यार्थांना शिकविण्यासाठी त्याच समाजातील शिक्षकांची नेमणूक केली जावी. महात्मा फुले यांनी सर्व वर्गातील स्त्रिया, शूद्र व अतिशूद्र समाजातील विद्यार्थांना शिक्षण देण्यासाठी शाळा सुरू केल्या. महात्मा फुले कृतीशील व वैचारिक समाजसुधारक होते.

## भारतीय प्रबोधन परंपरेचे महात्मा फुले उद्‌गाते - डॉ. राहुल कोसंबी



**छत्रपती संभाजीनगर :** गेल्या दोनशे वर्षांत पाया रचला गेलेल्या भारतीय प्रबोधन परंपरेचे क्रांतिसूर्य महात्मा फुले हे उद्‌गाते आहेत. युगप्रवर्तक, कृतिशील विचारवंत म्हणूनही त्यांचे मोठे योगदान आहे, असे प्रतिपादन अभ्यासक डॉ. राहुल कोसंबी यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात क्रांतीसूर्य महात्मा फुलेजयंती निमित्त शुक्रवारी कार्यक्रम झाला. कुलगुरु डॉ. विजय फुलारी यांच्या अध्यक्षतेखाली महात्मा फुले सभागृहात हा कार्यक्रम झाला. यावेळी प्रकुलगुरू डॉ. वाल्मिक सरवदे, कुलसचिव डॉ. प्रशांत अमृतकर, महात्मा फुले प्रतिष्ठानच्या संचालक डॉ. अपर्णा अष्टपुत्रे यांची उपस्थिती होती.

यावेळी डॉ. राहुल कोसंबी यांचे 'महात्मा फुले यांच्या समाज परिवर्तनाचे प्रारूप' या विषयावर व्याख्यान झाले. ते म्हणाले की, महात्मा ज्योतिबा फुले यांनी सैध्दांतिक मांडणी करून बहुजनांचे प्रबोधन केले.

# आतकोली पठारावरील कचरा डेपो प्रकल्प रद्द करा!

## स्थानिकांचे आंदोलन

**मुरबाड :** आतकोली पठारावर गुरचरण जागेत कचरा डेपो प्रकल्प उभारणाऱ्या ठाणे पालिकेविरोधात आतकोलीसह परिसरातील महिला, वृद्ध, शालेय विद्यार्थ्यांनी स्थानिक शेतकरी समितीचे रमेश शेलार, प्रकाश भोईर यांच्या नेतृत्वाखाली एक दिवसीय आंदोलन करून तीव्र विरोध केला. कचरा डेपो प्रकल्प रद्द करावा ही मागणी स्थानिक भूमिपुत्र शेतकरी संघर्ष समितीने सहा महिन्यांपूर्वी केली होती.

आंदोलनाला ठाणे पालघर जिल्ह्यातील सर्वपक्षीय नेते, कार्यकर्ते, खासदार बाळ्या मामा म्हात्रे, माजी खासदार कपिल पाटील, कुणबी सेनाप्रमुख विश्वनाथ पाटील, शिवसेना नेते प्रकाश पाटील, मुरबाडचे आमदार किसन कथोरे, भिवंडी ग्रामीणचे आमदार शांताराम मोरे यांनी उपस्थित राहून आतकोली कचरा डेपोला तीव्र विरोध केला.



### स्थानिक पंचक्रोशी संघर्ष समिती स्थापन

आतकोली पठारावर ठाणे महानगरपालिकेचा कचरा टाकण्यास सुरुवात करताच आतकोली परिसरातील १४ गावांतील नागरिकांनी डम्पिंग विरोधी स्थानिक पंचक्रोशी संघर्ष समिती स्थापन केली. या समितीतर्फे वाशेरे गावाजवळ एक दिवसीय धरणे आंदोलन केले.

## भिवंडीत १४४४ इमारती धोकादायक

**भिवंडी :** पालिका प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार भिवंडी शहरात १४४४ इमारती धोकादायक असल्याचे समोर आले आहे. निष्पन्न झाले आहे.

मागील वर्षी शहरात पाच प्रभाग समिती अंतर्गत १३११ इमारती धोकादायक होत्या. पालिका क्षेत्र अती धोकादायक सी - १ श्रेणीतील इमारतींची संख्या २८९ आहे. इमारत निर्मनुष्य करून दुरुस्ती करण्याच्या सी - २ ए श्रेणीत ७३८, इमारतीमध्ये राहून दुरुस्ती करण्याच्या सी - २ ब श्रेणीत ३७२, किरकोळ डागडुजी करण्यासारख्या सी- ३ श्रेणीत ४५ इमारतींचा समावेश आहे, अशी माहिती शहर विकास अधिकारी अरविंद घुगरे यांनी दिली.

# मेट्रो कारशेडसाठी झाडांची कत्तल नको!

## भाईंदरमध्ये ग्रामस्थांसह राजकीय पक्षांचा आंदोलनाचा इशारा



**भाईंदर :** भाईंदर पश्चिमेच्या डोंगरी येथे सरकारी जागेवर मेट्रो कारशेडसाठी एकूण १२ हजार ४०० झाडे तोडण्याविरोधात डोंगरी भागातील ग्रामस्थांसह मनसे, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट, आम आदमी पार्टी तसेच काही संस्थांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे. शुक्रवारी सुनावणीवेळी देखील ग्रामस्थांनी झाडे व वन्यजीव वाचवण्याचे फलक झळकावत डोंगरी येथील कारशेड रद्द करण्याची मागणी केली.

महापालिका प्रशासनाने जनतेला कोणतीच माहिती होऊ नये म्हणून शहरात कुठल्याही स्टॉलवर न मिळणाऱ्या आणि खप नसणाऱ्या स्थानिक वृत्तपत्रात ९ हजार ९०० झाडे तोडण्याबद्दलची नोटीस दिली. ही माहिती अधिकृत वेबसाईटवर प्रसिद्ध केली नव्हती. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करा आणि पुन्हा नोटीस प्रसिद्ध करा अशी मागणी सुनावणी वेळी करण्यात आली.

लोकांना माहितीच न मिळाल्याने अनेक लोकांना मुदतीत तक्रारी करता आल्या नाहीत, असे नागरिकांचे म्हणणे आहे. सुनावणी वेळी मीरा भाईंदरमधील अनेक नागरिकांसह उत्तन, पाली, चौक, डोंगरी, तरोडी आदी भागातील ग्रामस्थ उपस्थित होते. झाडांवर कुऱ्हाड चालवून होणारा विकास नको अशी भूमिका अनेकांनी मांडली.

### भूमिपूजनाला ६० वर्षे उलटली, तरी काम पूर्ण होईना

# पनवेल-धोदाणी-माथेरान रस्ता अद्यापही अपूर्णच

**माथेरान**

पनवेल तालुक्यातील नागरिक आणि माथेरानच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा असलेला पनवेल-धोदाणी-माथेरान रस्ता आजही केवळ कागदावरच अस्तित्वात आहे. सन १९६० मध्ये महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते या रस्त्याचे भूमिपूजन झाले होते. मात्र, साठ वर्षांनंतरही प्रत्यक्षात रस्ता पूर्ण झालेला नाही.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियोजनात या रस्त्याचा समावेश होता. सुमारे ५३.३७ लाख रुपयांच्या अंदाजपत्रकात पनवेल ते धोदाणी दरम्यान टप्प्याटप्प्याने डांबरीकरणाचे काम झाले. मात्र, धोदाणी ते माथेरान हे सुमारे ७-८ किमी जंगलातून जाणारे आव्हानात्मक अंतर कोणत्याही ठेकेदाराने स्वीकारले नाही, आणि त्यामुळे हा टप्पा पूर्ण होऊ शकला नाही. स्थानिक पातळीवर या रस्त्याबाबत चर्चा नेहमीच होते, परंतु राजकीय इच्छाशक्तीच्या अभावामुळे आजही हा रस्ता जैसे थे स्थितीत आहे. सामाजिक कार्यकर्ते सातत्याने पाठपुरावा करत आहेत. मात्र तरीही त्यांच्या प्रयत्नांना यश येत नसल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली.

### फिनिक्युलर रेल्वेचा प्रस्तावही अर्धवटच

सन २०११ मध्ये तत्कालीन नगराध्यक्ष मनोज खेडकर यांच्या पुढाकाराने धोदाणी ते माथेरान फिनिक्युलर रेल्वेचा प्रस्ताव समोर आला. एमएमआरडीएने राईट्स या संस्थेमार्फत सविस्तर पाहणी करून प्रकल्प शक्य असल्याचे सांगितले. त्यानंतर १०० कोटी रुपयांचे ग्लोबल टेंडरही काढण्यात आले. मात्र, काही राजकीय हस्तक्षेपामुळे हा प्रकल्प रद्द करण्यात आल्याचे समजते.



# खारफुटीच्या नव्या प्रजातीचा प्रयोग नवी मुंबईत यशस्वी

**उरण :** नवी मुंबई किनाऱ्यावर पहिल्यांदाच 'रायझोफोरा म्युक्रोनाटा' नावाच्या खारफुटी प्रजातीचा प्रयोग यशस्वी झाला आहे. त्याची मुळे वनस्पतीच्या वरच्या भागात असतात.

पंतप्रधानांच्या मिष्टी (मॅन्ग्रोव्ह इनिशिएटिव्ह फॉर शोरलाइन हॅबिटॅट्स अँड टेन्जिबल इन्कम्स) उपक्रमांतर्गत जून २०२३ मध्ये वाशी रेल्वे स्थानकाजवळील खारफुटी पुनर्संचयित ठिकाणी रायझोफोरा म्युक्रोनाटाची सुमारे २,३०० रोपे लावण्यात आली होती. खारफुटी सेलच्या अधिकाऱ्यांनी पुष्टी केली की सर्व रोपे जिवंत राहिली आणि लागवड यशस्वी झाली.

नवी मुंबई आणि एमएमआरमध्ये सामान्यतः एव्हिसेनिया मरीना प्रजातीच्या खारफुटींचे वर्चस्व आहे.